प्रकरण ४ थे

# गांधी - आंबेडकर - प्रेमानंद गज्वी या नाटकातील कथानक, व्यक्तिरेखा, संवाद आणि संघर्ष

## प्रकरण चौथे

# 'गांधी-आंबेडकर' - प्रेमानंद गज्वी या नाटकातील कथानक, व्यक्तिरेखा, संवाद आणि संघर्ष

प्रेमानंद गज्वी यांचे 'गांधी-आंबेडकर' हे नाटक एक वैचारिक आणि मनोविश्लेषणात्मक स्वरूपाचे नाटक आहे. आजपर्यंतच्या भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील घटना आपणाला माहीत आहेत. गांधी-आंबेकडरांचा पुणे करार, देशाची फाळणी व पाकिस्तानची निर्मिती. या सर्व घटनांसाठी गांधीजींनाच कारणीभूत मानलं जातं आणि अस्पृश्यांचे कार्य करीत असताना डॉ. आंबेडकर देश स्वातंत्र्यासाठी झटले नसल्याचं समजलं जातं. ''समाज हा सतत प्रयोगशील मनस्थितीत असला पाहिजे.'' हे डॉ. आंबेडकरांचे विधान आणि विसरता येत नाही गांधी-आंबेडकर यांच्यातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय संदर्भातील त्यांचा तो संघर्ष. मुळातच भारतीय स्वातंत्र्याची सारी सुत्रे गांधीजींच्या हाती एकवटलेली होती. ते 'महात्मा' म्हणून मान्यता पावले होते. अशावेळी डॉ. आंबेडकरांनी गांधीजीना त्यांच्याच समोर त्यांच्या चित्तशुद्धीबद्दल त्यांच्या महात्मेपणाबद्दल काही बोलणं आणि तेवढ्याच त्वेषानं 'तुमचा जन्मही झाला नव्हता तेव्हापासून मी अस्पृश्यांच्या प्रश्नाचा विचार करीत आहे.' असे गांधीजींनी डॉ. आंबेडकरांना सुनावणं... एक जबरदस्त संघर्ष यांच्यामध्ये होता. अशा विचारातून गज्वींना सुचलेल हे मनोविष्लेषणात्मक नाटक गांधी-आंबेडकरांच्या जीवनातील इतिहासावर आधारीत आहे.

**प्रेमानंद गज्वी यांच्या नाटकातील कथानक :**

या नाटकातील गांधी-आंबेडकर या दोन प्रमुख व्यक्तिरेखा आहेत. मनातल्या प्रश्नांच निरसन व्हावं म्हणून हे नाटक लिहीत असेन तर सुत्रधार हवा. इतिहासातील गांधी-आंबेडकरांसोबतच्या सर्व व्यक्ती नाटकात घेण्यापेक्षा नाटक लेखकाने सुत्रधार होऊन नाटक निर्माण केले आणि तो सुत्रधार म्हणजे विदुषक. गांधी-आंबेडकर आणि विदूषक

अशा तीनच पात्रांमध्ये गज्वी यांनी या नाटकाची मांडणी केली आहे. इतिहासातील कोणत्याही घटनेला तडा न जाऊ देता गज्वी यांनी या नाटकाची रचना केली आहे.

नाटकाची सुरुवात विदुषक सर्कशीतील तालबद्ध लयीवर नाचत पृथ्वीगोलाशी खेळण्याने होत आहे. गोल उंच उडवतो आहे, झेलतो आहे. समोर प्रेक्षकांकडे लक्ष जाताच प्रेक्षकांशी बोलतो आहे. अशाप्रकारे या नाटकाची सुरूवात होत आहे. विदुषक म्हटलं की, आपणाला हसायला येतं तो त्याचा वेश, तोंड रंगवलेला चेहरा आणि काहीतरी खोड्या काढून पळून जाणारा. सर्कशीतला हा विदूषक सर्वांना आवडतो. विदूषक हा सुत्रधार आहे. पण विदुषकाच्या रुपाने लेखकच या नाटकाचा सुत्रधार आहे आणि तोच गांधी-आंबेडकरांना प्रश्न विचारतो आहे. त्याचे स्पष्टीकरण देतो आहे. त्यांना चिडवतो आहे. गंभीरही करतो आहे. असा हा विदुषक या नाटकाचा सुत्रधार आहे.

डॉ. आंबेडकर आणि गांधीजी यांची पहिली भेट गांधीजी ६२ वर्षे वयाचे असताना अंगावर पंचा, उपरणं तर डॉ. आंबेडकर ४० वर्षे वयाचे अंगात सूट, ठिकाण मणिभवन येथे होत आहे. रंगमंचावर गांधी-आंबेडकरांच्या पहिल्या भेटीतील प्रसंग आहे. त्यामध्ये आंबेडकरांच्या गांधीजीबद्दल व त्यांच्या कॉंग्रेसबद्दल काही तक्रारी आहेत आणि त्या तक्रारी कोणत्या आहेत या विचारण्यासाठी गांधीजीनी आंबेडकरांना बोलावलेले असते. त्यावेळी-

गांधी : हं, बोला, काय म्हणणं आहे आपलं?

आंबेडकर : माझं काय म्हणणं असणार? तुमचच म्हणणं ऐकण्यासाठी तुम्ही मला इथ बोलावलत. तुम्हीच सांगा.

गांधी : (विराम) तुमच्याबद्दल बरच काही आलय माझ्या कानावर.

आंबेडकर : काय?

गांधी : हेच. माझ्याबद्दल कॉग्रेसबद्दल तुमच्या खूप तक्रारी आहेत.[१]

अशाप्रकारे त्यांच्या पहिल्या भेटीमध्ये आंबेडकरांच्या असणाऱ्या तक्रारी काय आहेत. याची विचारणा करण्यासाठी गांधीजींनी आंबेडकरांना भेटण्यासाठी बोलविलेले असते. त्यांच्या चर्चेमध्ये आंबेडकर म्हणतात, मी माझ्या अस्तित्वाचा जेव्हा विचार करतो

तेव्हा मला सारखं वाटतं, मला मातृभूमी नाही. मला देश नाही मी जणूकाही कुणी परका आहे. डॉ. आंबेडकरांना असं वाटण्याचं कारण म्हणजे या देशात अस्पृश्यांना हिंदू समाजाने दिलेली वागणूक, त्यांचा केलेला छळ, त्यांच्यावर केलेला अन्याय या सर्वांशी डॉ. आंबेडकर सामना करून बॅरीस्टर झाले आणि आपला समाज सुधारण्याचा प्रयत्न करु लागले. हिंदू समाजामध्ये आपल्या दलित समाजाचा समान न्याय मिळावा यासाठी लढत असताना गांधीजी व त्यांची काँग्रेस त्यांना त्यांच्या मागण्या पूर्ण करण्यास तयार नाहीत. म्हणून डॉ. आंबेडकर आणि गांधीजी यांच्यात त्या अस्पृश्यता निवारणावरून व अस्पृश्यांना इतरांप्रमाणे देवळात प्रवेश मिळावा, पाणवठ्यावर पाणी भरू द्यावे. परंपरेने चालत आलेले रीतीरीवाज बंद करावेत. अस्पृश्यांना समान वागणूक द्यावी. आंबेडकरांची हिच अपेक्षा आहे. पण त्यांच्या त्या इच्छेला, मागणीला गांधीजी तयार नाहीत आणि म्हणूनच त्यांच्यात संघर्ष निर्माण झाला आहे.

आंबेडकरांच्या काही म्हणण्यावर गांधीजी कार्य करीत आहेत. अस्पृश्यता निवारण, मंदीर प्रवेश इ. अशी कामं करणं हे स्पृश्याचं कर्तव्यच आहे असे गांधीजी म्हणतात, डॉ. आंबेडकरांना गांधीजी म्हणतात "तुमचा जन्म झाला नव्हता तेव्हापासून मी अस्पृश्यांच्या प्रश्नाचा विचार करीत आहे. आणि तुम्ही म्हणता अस्पृश्याबद्दल माझी चित्तशुद्धी झाली नाही?" पहिल्या अंकामध्ये या दोघांचीही ठाम भूमिका दाखवली आहे. गांधीजी आणि आंबेडकर आपापल्या मताशी प्रामाणिक आहेत. मुसलमान, शिख यांच्याप्रमाणे अस्पृश्य हा स्वतंत्र घटक आहे. असे ब्रिटीशांना आंबेडकरांनी पटवून देऊन स्वतंत्र मतदार संघ मंजूर करून घेतला होता. पण त्या मतदार संघाला गांधीजीचा विरोध आहे. गांधीजी म्हणतात अस्पृश्य समाज हा हिंदू समाजाचा अभिन्न भाग आहे. तेव्हा त्यांना स्वतंत्र मतदार संघ मिळणार नाही. अशी गांधीजींची ठाम भूमिका आहे.

गांधी : मुळीच नाही. अस्पृश्य हे हिंदू समाजाचा अभिन्न भाग आहेत. त्यामुळे राजकीय दृष्ट्या त्यांना हिंदूपासून वेगळे करता येणार नाही.

आंबेडकर : का वेगळं करता येणार नाही? हिंदू समाज म्हणजे चातुर्वर्ण ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र आणि तुमच्या मते अस्पृश्य म्हणजे पंचमवर्ण.[२]

अशाप्रकारे आंबेडकर गांधीजींना प्रश्न विचारतात. म्हणजे केवळ मला विरोध करण्यासाठी तुम्ही अस्पृश्यांच्या राजकीय हितावर पाणी ओतणार? गांधीजी म्हणतात, अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ दिला तर ते कायमचे अस्पृश्य राहतील म्हणून ते नकार देतात. आंबेडकर म्हणतात ते काय राहतात आणि काय नाही हे तुमच्यापेक्षा मी जास्त जाणतो असे गांधीजींना ठणकावून सांगतात. परंतु गांधीजी आपल्या मतावर ठाम असतात आणि आंबेडकरही आपल्या मतावर ठाम असतात. अस्पृश्यता हा हिंदू धर्मावरील कलंक आहे आणि तो उच्च म्हणवल्या जाणाऱ्या हिंदूनीच दूर केला पाहिजे असे गांधीजी म्हणतात. पण आंबेडकर त्यांना म्हणतात अस्पृश्यता हिंदूवरील कलंक नव्हे तर तो आमच्या देहावरील कलंक आहे आणि तो आमचा आम्हीच दूर केला पाहिजे. त्याच दुःख समजण्यासाठी खरोखरच तुम्ही अस्पृश्यांच्या घरी जन्माला यायला पाहिजे होतं. गांधीजी आंबेडकरांना तुम्हालाआलेल्या अनुभवाने तुमची बुद्धी गोंधळून गेलेली दिसते असे म्हणतात. त्यावर आंबेडकर म्हणतात, माझी विवेकबुद्धी! या गोंधळात कदाचित आणखी भर पडेल आणि तुम्हाला त्याची किंमतही मोजावी लागेल आणि तीही अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदार संघाला मान्यता देऊन. अशाप्रकारे हे दोघेही आपापल्या मताशी ठाम आहेत. याच ठिकाणी त्यांची पहिली भेट संपते.

विदूषक हा त्या दोघांच्यामधील दुवा आहे. त्यांचे प्रसंग घडवून आणणे आणि त्यांच्या बोलण्यानंतर येऊन त्यांच्या बोलण्यावर चर्चा करणे त्याचे स्पष्टीकरण करायचे. विदूषकामुळे कथानक पुढे चालू राहते, ते गतिमान होते. या नाटकामध्ये विदुषक जे बोलतो आहे, गांधी-आंबेडकरांना जे प्रश्न विचारतो आहे ते प्रश्न सामान्य माणसाला निर्माण झालेले आहेत. पण विदुषकाच्या माध्यमातून नाटककाराने विचारले आहेत.

उदा. -

विदुषक : एकसारख्या त्या आंबेडकरांच्याच विचारांचा विचार करीत बसल्यावर दुसरं काय होणार? तरी बरं मी आधीच बजावलं होतं की, डॉ. आंबेडकर भेटीला बोलावता हे ठिक! पण जरा सांभाळून बघता, बघता करून गेले ना तुमची पंचाईत ! आजवर तुम्हाला कुणी काही बोलण्याची हिम्मत केली होती? तुमचं सारं महात्मेपण धुळीस मिळवून गेले. आभास म्हणाले, डॉ.

आंबेडकरांचा जन्मही झाला नव्हता तेव्हापासून तुम्ही पंचमवर्णीयांच्या प्रश्नांवर विचार करीत आलात. तरी तो विचार केवळ आभास ठरावा? तुम्ही एकदा म्हटलं होतं ना पंचमाचा नेता होईल असा एकही पुढारी त्यांच्यात दिसत नाही. मग आता काय मत आहे.?[३]

अशाप्रकारचे प्रश्न विचारून गांधीजींना चिडवत आहे. विदुषक व गांधीजीप्रमाणेच आंबेडकरांकडे जाऊन त्यांनाही चिडवतो, त्यांच्याजवळ जाऊन गप्पा मारतो. गांधी-आंबेडकरांच्यात या संघर्षामध्ये विदुषक आंबेडकरांना म्हणतो,

विदूषक : तुमचा होतो खेळ पण जीव जातो आमचा सामान्यांचा.

आंबेडकर : तू आणि सामान्य? तू तर असामान्य! अरे, जे काम माझी दहा भाषणं करू शकणार नाहीत असं काम तुझ्या एका खेळानं होतं.[४]

वरील त्यांच्या बोलण्यावरून नाटककाराने सर्व प्रसंग चोख मांडले आहेत असे दिसते. एका भाषणात डॉ. आंबेडकर म्हणाले होते, 'माझी दहा भाषणं आणि जलसेकार कलावंताचा एक जलसा याची बरोबरी होते.' म्हणजे हृदयाचा ठाव घेऊन मर्मग्राही प्रहार करणारी कलावंताच्या कलेतील संवेदना, खेड्या-पाड्यातून आजही जिवंत असलेला तमाशा, जलसे, खेळे-मेळे या कला आणि समाज प्रबोधनाचे व्रत घेतलेले ते सोंगाडे यांचा त्यांच्या कलेच्या माध्यमातून समाजावर खूप परिणाम होत असतो आणि हे आंबेडकर जाणून होते. हा विचारही नाटकाच्या माध्यमातून लेखकाने या ठिकाणी मांडला आहे.

पहिल्या भेटीतील गांधी-आंबेडकरांच्या भेटीत गांधीजी दुखावले होते त्यामुळे दुखावलेला वाघ चार-दोन बळी घेणारच, असे विदुषक आंबेडकरांना म्हणतो तेव्हा आम्ही शिदनाक, रायनाक अशा शुरांचे वंशज आहोत. रात जागवणाऱ्याला ते ठाव नसतं की काय विदुषका 'शंभर दिवस मेंढरागत जगण्यापेक्षा एक दिवस का होईना पण सिंहासारखं जगलं पाहिजे.' या नाटकामध्ये लेखकाने या गांधी-आंबेडकरांच्या ऐतिहासिक घटनाप्रमाणेच त्यातील लहान-मोठी वाक्ये त्यांच्या तोंडून सांगितली आहेत. कोणत्याही घटनेचा संदर्भ न विसरता, वगळता लेखकाने योग्य पद्धतीने त्याची मांडणी केली आहे. हे नाटक इतिहासातील घटनांवर आधारीत असल्यामुळे त्यामध्ये त्या घटनांमध्ये कसलाही बदल

करता येत नाही. आणि दोन अंकामध्ये हे नाटक बसवत असताना त्यातील पात्रे आणि त्यांचे संवाद हे नाटकाच्या असणाऱ्या अडीच-तीन तासंच्या वेळेमध्ये घेणे आवश्यक. त्याचबरोबर इतिहासातील गांधी-आंबेडकरांच्या जीवनातील प्रसंगही येणे महत्त्वाचे. त्याशिवाय नाटकात संघर्ष येणार नाही आणि ते नाटक संघर्षाला धरुण राहणार नाही. यासाठी लेखकाने ठळक घटनांबरोबर त्यांना वाटणारे महत्त्वाचे लहान-लहान प्रसंगही त्यामध्ये घेऊन नाटकाची मांडणी केली आहे. या नाटकामध्ये तीनच पात्रे असली तरी विदुषक या सुत्रधाराने इतिहासात त्यांच्याबरोबर असणाऱ्या पात्रांची उणीव भरून काढली आहे. त्यामुळे नाटक इतिहासाला धरून राहण्यास मदत होते. तसेच हे नाटक मनोविश्लेषणात्मक असल्यामुळे नविन-नविन येणाऱ्या पीढीला यांचा इतिहास वाचून ऐकून निर्माण होणाऱ्या प्रश्नाची जाणीव होते, माहीती मिळते.

या नाटकातील कथानकाची मांडणी करीत असताना लेखकाने हे नाटक तीनच पात्रात मांडले आहे आणि या नाटकात दोनच अंक आहेत. या नाटकामध्ये गांधी-आंबेडकर जितके महत्त्वाचे तितकाच विदूषक हा सुत्रधारही महत्त्वाचा आहे. इतिहासातील क्रमवार घटनांप्रमाणे सर्व घटनांची यामध्ये लेखकाने मांडणी केली आहे. गांधी-आंबेडकरांची पहिली भेट अस्पृश्यांच्या निवारण प्रश्नावर होते. डॉ. आंबेडकरांनी इंग्रज सरकारकडून 'स्वतंत्र मतदार संघाला' गांधीजी विरोध करतात आणि त्यांच्या जीवनातील संघर्षाला सुरूवात होते. त्याचा याविषयीचा संघर्ष महत्त्वाचा ठरला आहे. 'स्वतंत्र मतदार संघाला' विरोध करीत असताना गांधीजींनी आपले प्राण पणास लावले होते. त्यांनी आमरण उपोषण करून डॉ. आंबेडकरांना तडजोड करण्यास भाग पाडलं. त्यांचे प्राण वाचवण्यासाठी सर्वांनी आंबेडकरांना विनंती केली. गांधींची पत्नी, मुलगा यांनीही आणि आंबेडकरांच्या पत्नीही त्यांना गांधींचे प्राण वाचवण्यास सांगतात. विनंतीबरोबरच समाजातील काही घटकांकडून त्यांना धमक्याही आल्या होत्या. हे सर्व ते विदुषकाला सांगतात. पुढे असेही म्हणतात जे हात इंग्रजांच्या बाजूने लढले ते हात देशाच्या बाजूने नसते लढले. तेव्हा विदुषका या हातांना आपलं कुणी म्हणलच नाही. असे आपले दु:खही ते विदुषकाजवळ व्यक्त करतात.

गांधीजी आंबेडकरांच्या जन्मापूर्वीपासून अस्पृश्य निवारणाचे कार्य करीत होते. परंतु पूर्णपणे चातुर्वर्ण व्यवस्था ते नष्ट करीत नव्हते. ब्राह्मण हा सर्वांना गुरु हवाच असे त्यांचे मत होते. अस्पृश्यावरील होणारे अन्याय फक्त थांबवावेत असे त्यांचे म्हणणे होते. म्हणून एकेठिकाणी आंबेडकर म्हणतात.

आंबेडकर : गांधीजीच्या मनात आलेल्या आपुलकीबद्दल मी ऋणीच आहे. त्यांचा, पण दाईचं प्रेम आणि आईचं प्रेम यात श्रेष्ठ कुठलं? गांधीजी दाईच्या प्रेमानं आमच्या डोक्यावर हात फिरवतात पण आईच्या ममतेनं कुशीत घेण्याची वेळ आली की, दूर लोटतात. तसं नसतं तर जागवलेल्या स्वाभीमानाच्या लढाईत त्यांनी विरोध केला असता?"[५]

आंबेडकरांच्या या मतावरून गांधीजींचे अस्पृश्याविषयीचं प्रेम हे आईचं नसून दाईचं होतं हे लक्षात येतं. म्हणून आम्ही कुणाच्या दयेवर जगू शकत नाही. राजकीय हक्क आमच्या न्यायाच्या मार्गातील आशेचा एक किरण आहे. त्यासाठी आम्हाला आमचा स्वतंत्र मतदार संघ आवश्यक आहे. मुसलमान, शिख यांना ज्याप्रमाणे स्वतंत्र मतदार संघ आहेत त्याप्रमाणे ब्रिटीश सरकारने अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ दिला असताना गांधीजींचा त्याला विरोध का? अशाप्रकारचा प्रश्न डॉ. आंबेडकर विचारतात.

विदूषक हा या दोघांचं मनही आहे आणि त्यांच्यातील विचारांचा भाष्यकारही आहे.

अस्पृश्यांना दिलेली स्वतंत्र मतदार संघाची योजना जोपर्यंत ब्रिटीश सरकार मागे घेत नाहीत, तोपर्यंत गांधीजींनी आमरण उपोषण येरवडा जेलमध्ये सुरू केलेले असते. या प्रसंगामध्ये विदूषक गांधीजींना विचारतो हे काय सुरू केलंत गांधीजी, अल्पसंख्याकांच्या प्रश्नावर ब्रिटीश सरकारनं निर्णय घ्यावा म्हणून दिलेल्या निवेदनावर तुम्हीसुद्धा केली होती सही. अशी त्यांनी केलेल्या कामाची जाणीव करून देतो व नैतिकदृष्ट्या तो निर्णय गांधीजीनी मान्य करायला हवा होता असे सांगतो. पण गांधीजी म्हणतात माझ्या आतल्या आवाजाचं काय? माझ्या मनाविरुद्ध घडणाऱ्या घटनेबद्दल मी प्रायश्चित्त घेऊ नये का? पण विदूषक गांधीजींना खूप प्रश्न विचारतो.

उदा. -

विदुषक : म्हणजे तुम्ही तुमच्याच माणसांच्या विरुद्ध....

विदुषक : पंचवर्णीय तुमची माणसं नव्हेत?

विदुषक : प्रेम? हे जर खरं असेल तर पंचमवर्णीयांवरील मुक्तीचा मार्ग म्हणून त्यांना मिळालेल्या स्वतंत्र मतदारसंघाला तुमचा विरोध कशासाठी?

विदुषक : मुसलमानांच्या सवत्यासुभ्याचं काय? काय म्हणून तुम्ही त्यांचं स्वतंत्र प्रतिनिधीत्व मान्य केलं?

विदुषक : हे जर पाप असेल, तर ते नाहीसं करण्याचा कोणताच प्रयत्न का नाही केला आजवर ? तोच वारसा चालवणार आहात तुम्ही? चालवा, पण मग किमान दुटप्पी वागणं तरी सोडा.

विदुषक : सत्याचे आग्रही तुम्ही. सत्यही ऐकू शकत नाही. डॉ. आंबेडकर तुमची राजकीय प्रतिष्ठा पार धुळीस मिळवतील या भीतीपोटी सुरू केलंत तुम्ही हे उपोषण.[६]

अशाप्रकारे गांधीजींना प्रश्न विचारतो, त्यांना बोलतो. त्यांच्या या बोलण्याने गांधीजींना ठसका लागतो. विदुषक त्यांना पाणी पाजतो. त्यावेळेस डॉ. आंबेडकर येतात. गांधी-आंबेडकरांमध्ये बोलणे सुरू होते. गांधीजी म्हणतात मला खात्री होती तुम्ही मला भेटायला याल. पण आंबेडकरांना नाविलाजास्तव अस्पृश्य समाजाच्या राजकीय हक्कावर पाणी सोडून गांधीजींचे प्राण वाचवण्यासाठी तडजोड करावी लागते. त्यांच्या या तडजोडीच्या ठरावालाच 'पुणे करार' असे म्हणतात. गांधींना आंबेडकर म्हणतात, "गांधीजी तुम्ही आपलं जीवन अस्पृश्यांसाठी त्यांच्या हितासाठी खर्च केलं तर तुम्ही आमचे वीरपुरूष व्हालं."[७] गांधीजी आंबेडकरांना म्हणतात, "मी सहमत आहे तुमच्या वेदनेशी तुम्ही हिंदू धर्माला त्यांच्या गतकालीन पातकाचं निरसन करण्याची जी संधी देत आहात त्याबद्दल मी तुमचा ऋणी आहे."[८]

पुणे करारामुळे आपल्या समाजाचा खूप मोठा तोटा झाला आहे. त्यामुळे आंबेडकर खूप नाराज असतात. एकदा आंबेडकर आपल्या भाषणामध्ये अस्पृश्य समाज बांधवांना सांगतात,

''हिंदू समाज गुरामगिरीत खितपत पडला आहे. याचे कारण तो आपल्या ईश्वराची वाट पहात बसला आहे, हेच आहे. या जगात ईश्वर असो वा नसो, तुम्ही विचार करण्याची गरज नाही, या जगात ज्या घडामोडी होतात. ती माणसेच करीत असतात. तुमचा उद्धार करण्यास कोणीही येणार नाही. तुम्ही मनात आणले तर तुमचा उद्धार तुम्हीच करू शकाल. पंढरपूर, त्र्यंबक, काशी, हरिद्वार वगैरे ठिकाणी यात्रा करून किंवा एकादशी, सोमवार वगैरे उपवास करून शनिमहात्म्य, शिवलिलामृत, गुरुचरित्र इ. पोथ्यांची रामायण करून तुमचा उद्धार होणार नाही. तुमचे वाडवडील हजारो वर्षे या गोष्टी करीत आले तरी तुमच्या सोचनीय स्थितीत तसुभरही फरक पडला नाही. तुम्ही केलेल्या उपोषणांनी तुमची उपासमार टळली नाही. तेव्हा आता तुमचा उद्धार करण्यास आता एकच मार्ग आहे आणि तो मार्ग म्हणजे राजकारण - कायदा''[९]

याठिकाणी आंबेडकर असे सांगतात की, कायदा तुमच्या हातात असेल तर तुम्हाला सर्व काही मिळेल. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण हे देणं देशातील कायदा करणाऱ्या सत्तेच कार्य आहे. सर्व सुखाचं आगर कायदा आहे. म्हणून कायदा करण्याची शक्ती पूर्णपणे हस्तगत केली पाहिजे. तुमच्या उद्धाराचा हाच एक मार्ग आहे. लक्षात ठेवा समाज जागृत, सुशिक्षित व स्वाभीमानी असेल तरच त्याच सामर्थ्य वाढेल. या नाटकात आंबेडकर विदुषक चर्चा चालू असताना आंबेडकर म्हणतात, ''गांधीजींची मंदिर प्रवेशाची चळवळ एक राजकीय डाव होता. माझं राजकीय अस्तित्व संपवण आणि अस्पृश्यांचे आपणच एकमेव पुढारी आहोत. हे जगाला दाखवणं एवढाच गांधीजीचा हेतू होता.''[१०] हे विदुषकाच्या लक्षात आणून देतात. त्यानंतर पुणे कराराच्या वेळी कस्तुरबा गांधीनी डॉ. आंबेडकरांनी पदर पसरून जी विनंती केली त्याविषयी चर्चा होते. त्यावेळी विदूषक हा रमाबाईबद्दल विचार करीत असतो. आंबेडकरांना विचारतो, त्यांना का नाही शिकवलं, त्यांना का शिकू वाटलं नाही. आपणाला असे विचारतात त्यावर आंबेडकर उत्तर देतात. त्याला काही मर्यादा होत्या, काही अडचणी होत्या आंबेडकर एकदा रमाबाईशी भांडल्याचे

विदुषकाला सांगतात. विदुषक गांधीजीही कुस्तुरबाशी एकदा भांडल्याची आठवण करून देतो व असे महामानव सामान्य माणसाप्रमाणे आपल्याच माणसाशी का भांडतात कळत नाही असे विचारतो.

विदुषक हा या गांधी-आंबेडकर नाटकाचा सूत्रधार, कोरस, गांधी-आंबेडकरांचे मन आणि तोच भाष्यकार आहे. गांधी-आंबेडकरांचे बरेच प्रसंग विदुषकाने नाटकात सांगीतले आहेत. अगदी या ऐतिहासिक बारीक-सारीक घटनांचाही तपशील लेखकाने विदुषकाच्या माध्यमातून या नाटकात मांडले आहेत.

आंबेडकर आपल्या घरातील व्यक्तिबद्दल आणि समाजाबद्दल त्यांना शिक्षणाची जी अपेक्षा होती त्यामध्ये त्यांनी आपणाला निराशाच केल्याचं दिसतं, असे म्हणत. आंबेडकरांना शिक्षणाशिवाय आपल्या समाजाचा विकास होणार नाही असे वाटत असतानाच गांधीजी शिक्षणाची ती महती काय? माझी तीन मुलं कधी कोणत्याही शाळेत गेलीच नाहीत आणि तरीही माणूसकीच्या बाबतीत कुठं कमी पडत नाहीत असे म्हणतात. माझ्या मुलांना मी शिकवू शकलो नाही. माझं कर्तव्य मी बजावलं नाही. अशी माझी समजूत होत नाही. किंवा मला पश्चाताप होत नाही असे म्हणतात. हा गांधीजींचा आतला आवाज असे विदूषक म्हणतो. गांधीजी म्हणतात, ‘‘निरक्षर राहून उघड्या रस्त्यावर खडी फोडणं हे गुलामगिरीमध्ये राहून अक्षरज्ञान मिळविण्यापेक्षा चांगला आहे.’’[११]

विदुषकाने गांधीजींचा कस्तुरबा वरील संशय आणि विषय वासनेवरही प्रकाश टाकला आहे.

गांधीजींना आपला देश रामराज्यासारखा बनवायचा आहे. त्याविषयी विदुषक गांधीजींना विचारतो तुमच्या रामराज्यातील राम कसा असेल. त्यावर गांधीजी मौनव्रताची त्याला पाटी दाखवितात व उत्तर देण्याचं टाळतात.

सन १९३५. डॉ. आंबेडकर हिंदू समाजातील रुढी परंपरेला अन्याय अत्याचाराला कंटाळून धर्मातराची घोषणा करतात. त्यानंतर कोण म्हणे मुसलमान होणार, कोण म्हणे शिख होणार, कोण म्हणे ख्रिश्चन होणार, कोण म्हणे बौद्ध होणार पण प्रत्यक्ष घोषणेनंतर बाबासाहेब व गांधीजी एक वर्षानी भेटतात आणि त्या विषयावर त्या दोघांमध्ये चर्चा होते.

अधून-मधून विदूषक हा त्यांना प्रश्न विचारतो आहेच. आणि त्यांच्या संभाषणावर भाष्य ही करतो आहे. असे हे नाटकातील प्रश्न-उत्तर-संभाषण यामध्ये नाटकाचे कथानक आहे. लेखकाने या नाटकाचे कथानक खूप छान रचले आहे. विदूषक गवसला नव्हता तर ते अशक्य होत. त्याच्यामुळे नाटकात इतर पात्रे नसूनही त्यांची उणीव जाणवत नाही व नाटक चांगले वाटते. धर्मांतराच्या घोषणेनंतर गांधीजी-आंबेडकरांच्या भेटीमध्ये आंबेडकर गांधीजींना म्हणतात.

आंबेडकर : माझी धर्मांतराची घोषणा दुर्दैवाची गोष्ट वाटावी हे म्हणजे चमत्कारीकच म्हटलं पाहिजे. माझ्या स्वतंत्र मतदार संघाला विरोध करताना, अस्पृश्य लोक ख्रिश्चन किंवा मुसलमान झाले तरी चालतील पण, 'स्वतंत्र मतदारसंघ' देणार नाही अशी गर्जना करणारे तुम्ही... कमालं झाली ! पहा गांधीजी, हिंदुधर्मात आमचं कल्याण होणं केवळ अशक्य आहे.[१२]

अस्पृश्यांचे हीत करण्यासाठी आपण प्रयत्न करीत असताना आपणाला हा हिंदू समाज चातुर्वर्णातून कधी बाहेर निघणार नाही आणि अस्पृश्यांना समान वागणूक देणार नाही. म्हणून डॉ. आंबेडकरांनी आपणाला ज्या समाजात कुत्र्या मांजरापेक्षा हीन किंमत मिळते त्या हिंदू धर्मात जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही. मी धर्मांतर करणार असे जाहीर करून टाकले व गांधीजींना काळजी वाटू लागली. एवढा मोठा अस्पृश्य समाज हिंदू धर्मापासून विभक्त होणार. त्यांना खूप काळजी वाटत होती. आंबेडकरांना त्यांनी खूप समजावण्याचा प्रयत्न केला. पण आंबेडकरांनी त्यांना आपल्यावरच्या अन्यायाचे पाठीमागचे संदर्भ दिले व आपण घेतलेल्या निर्णयावर ठाम राहिले. आंबेडकरांना माणसाला माणूस म्हणून जगायला सांगणारा व समान वागणूक देणारा मानवतावादी धम्म निर्माण करायचाआहे. हिंदू धर्म कधी सुधारणार नाही, त्यातील चातुर्वर्ण व्यवस्था कधी नष्ठ होणार नाही, हा धर्म रुढी परंपरेने ग्रासलेला आहे. अस्पृश्यांचा त्या धर्मात कधीही विकास होणार नाही म्हणून आंबेडकरांनी धर्मांतराचा निर्णय घेतलेला असतो. गांधीजी एकेठिकाणी म्हणतात,

गांधीजी : जातीची उत्पत्ती मला माहित नाही आणि आध्यात्मिक अनुभूतीसाठी मला तिची गरजही वाटत नाही. मानवतेच्या हिताकरताच वर्णाश्रम धर्मानं

परंपरागत धंद्याचं बंधन टाकलं आहे. कोणताही उद्योग कमी दर्जाचा नाही. आध्यात्मिक शिकवण देणारा ब्राह्मण आणि भंगीकाम करणारा भंगी दोघांचेही धंदे समान योग्यतेचे आहेत. आत्म्याच्या स्वच्छतेकडे ध्यान ठेवणं ब्राह्मणाचं कर्तव्य आहे आणि समाजाच्या शरीराच्या स्वच्छतेकडे लक्षण ठेवणं भंग्याच कर्तव्य आहे. नेमुन दिलेलं काम योग्य तऱ्हेने पार पाडल्यास दोघांनाही सारखचं पुण्य लाभतं.

आंबेडकर : पुण्यशील महात्माजी, जातीसंस्थाच मोडायला निघालेला मी, तुमच्या जातीचा उल्लेख केला तर रागवू नका. तुम्ही चातुर्वर्ण वैश्य, बनिया जातीचे, लोकांनी तुम्हाला महात्मा ठरविण्यापूर्वी तुमच्यासमोर प्रश्न आला तेव्हा तराजू हातात घेण्याऐवजी कायद्याचा अभ्यास करून बॅरीस्टर झालात. पूर्वजांच्या धर्मव्यापावर कधीही केला नाही. तरीही आपल्या पूर्वजांचा धंदा करावा असं तुमचं सांगणं म्हणजे भडवेगिरी करणाऱ्यांच्या वारसांनी भडवेगिरी आणि वेश्यांच्या मुलींनी वेश्या व्यावसाय करावा असं सांगणं झालं.'[१३]

अशाप्रकारे दोघांमध्ये नेहमीच कोणत्या ना कोणत्या विषयावरून संघर्ष होताना यामध्ये दिसून येतो. आपले मत एकमेकांना समजावून पटवून सांगण्याचा प्रयत्न करणे परंतु आपल्या मताशी ठाम राहणे. आपली बाजू बरोबर आहे हेच समजावून सांगण्याचा प्रयत्न करणे यावरून त्याचा आपल्या निर्णयाशी असणारा एकनिष्ठपणा दिसून येतो.

धर्मांतराच्या निर्णयाशी ठाम असणारे आंबेडकर गांधीजींना म्हणतात, तुम्ही घाबरून आहात ब्राह्मणांना, जातीभेद कणा आहे. हिंदू धर्माचा, तो मोडून एकवर्णी समाज निर्माण करण्याचा प्रयत्न आहे माझा पण या प्रयत्नास तुम्हीच सहकार्य देणार नाही. कारण ब्राह्मणांना तुम्ही घाबरता, ब्राह्मणवर्ग आव्हान देईल तुमच्या नेतेपणाला आणि महात्मेपणालाही म्हणून तुम्हाला सांगतो, 'एक वैश्य बनिया, ब्राह्मणासकट सर्वांचं नेतृत्व करतो हे ब्राह्मणांना माहित नाही असे समजू नका. असे आंबेडकर गांधीजींना सांगतात आणि त्यांना म्हणतात, 'जोवर तुम्ही त्यांचे हितसंबंध जोपासता आहात तोवर ठिक त्यानंतर तुमची गय नाही. असे सांगतात. शेवटी आंबेडकर गांधीना म्हणतात.

आंबेडकर : ज्या लोकमान्य टिळकांचा राजकीय वारसा तुम्ही चालवत आहात. त्या टिळकांच्या केसरीच्या मतप्रणालीनुसार के. के. सकट नावाचे मातंग गृहस्थ एक आदर्श हिंदू आहेत. त्या सकटांना वर्षभर शंकराचार्यांच्या गादीवर बसवा सामाजिक समता न्याय मान्य असल्याबद्दल नि ऱ्हदयापालटाचा निदर्शक म्हणून शंभर एक ब्राम्हण कुटुंबांना संकटांच्या पाया पडण्यास लावा आणि हिंदू धर्मात अस्पृश्यतेला स्थान नाही हे सिद्ध करा. मी मुळीच धर्मांतर करणार नाही.[१४]

अशा आंबेडकरांच्या बोलण्यावर गांधीजींची स्थिती एखाद्या प्रचंड वादळात सापडावी अशी होते आणि या ठिकाणी पहिला अंक संपतो.

देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी जोरदार घडामोडी चालू असतात आणि इंग्रजाविरुद्ध सारा भारत देश खळवळून उठलेला असतो. तरीही इंग्रज या देशातून जायला तयार नसतात. म. गांधी 'चले जाव' असे सांगूनही ऐकत नाहीत. विदुषकाच्या अशा बोलण्याने दुसरा अंक सुरू होतो. गांधीजी उपोषणाला बसणार असतात काय होणार या महात्म्याचं? विदुषकाला काळजी लागली आहे. करेंगे या मरेंगे, चले जाव, इंग्रजांना गांधीजी सांगत आहेत आणि त्यासाठी एकवीस दिवसाचं उपोषण तेही पंच्याहत्तरीत गाधीजी धरत आहेत. या गांधीजींच्या वागण्यावर आंबेडकर म्हणतात, ''गांधीजींचा करेंगे या मरेंगे हा आदेश बेजबाबदार नि मुर्खपणाचा आहे.''[१५] आपला देश स्वातंत्र्यासाठी झटत असताना इंग्रज त्यांना गोळ्या घालून मारतात. त्यात गांधींची दखल कोण घेणार असे त्यांना वाटते. यावर विदूषक म्हणतो, झालं गांधीजींनी काहीतरी करावं आणि त्याविषयी आंबेडकरांनी आपलं मत व्यक्त केलेच बघा. विदूषक आणि आंबेडकरांमध्ये चर्चा दुसऱ्या महायुद्धामध्ये कॉंग्रेसची घसरलेली पत तो सावरण्याचा प्रयत्न गांधीजी करीत आहेत. सारा देश इंग्रजाविरुद्ध लढत आहे. पण विदूषक म्हणतो आंबेडकरांना त्याच काहीच वाटत नाही. इंग्रज सरकारच्या मंत्रिमंडळात मजुरमंत्री केल म्हणून तम्ही त्यांची बाजू घेता की काय? या प्रश्नावर आंबेडकर म्हणतात 'गोरगरीबांच्या हक्कासाठी, नोकरभरतीसाठी, स्त्रियांना गरोदरपणात रजा मिळवून देणं, कामगारांच्या कामाचे तास, त्या प्रमाणात पगार अशी

कीतीतरी कामं. ही कामं ज्यावेळी होताना मला दिसणार नाहीत त्या क्षणी मी माझा राजीनामा देईन नि बाहेर पडेन.''[१६] अशाप्रकारे विदुषकाच्या आरोपाचं खंडन करतात.

आंबेडकर : सारा देश? गांधीजींच्या चलेजाव चळवळीस मुसलमानांचा विरोध आहे. हिंदू महासभा सुद्धा दूर आहे आणि तरीही म्हणतोस सारा देश आंदोलनात उतरला आहे? तर मग पंधरा दिवसातच कस काय ठप्प झालं आंदोलन.[१७]

अशाप्रकारे आंबेडकर विदुषकाला विचारतात. आंबेडकर आणि विदुषक देश स्वातंत्र्याबद्दल चर्चा करतात. इंग्रजांना देशातून हाकलून दिले पाहिजे पण गांधीजींचा हेकेखोर स्वभाव आणि समोरच्या माणसावर संशय, मुख्य म्हणजे सत्ता फक्त काँग्रेसलाच मिळाली पाहिजे आणि स्वातंत्र्याचा प्रणेता म्हणून आपलाच गौरव झाला पाहिजे अशीच वृत्ती गांधीजींची असेल तर कोण काय करणार असे आंबेडकर म्हणतात. देशाच्या कल्याणाचा विचार केला तर मी कुणाला शत्रू मानलेलं नाही. देऊन टाका पाकिस्तान मुसलमानांना आंबेडकर विदुषकाला म्हणतात.

आंबेडकर : मी शत्रू या देशाचा? मी कधीच कुणाला शत्रू मानलेलं नाही आणि मी या देशाचा मित्र की शत्रू हे ही काळच ठरवेल. पण तरीही वस्तूस्थिती सांगतो, मुसलमानांच्या मनावर लोकशाहीचा प्रभाव पडत नाही. आस्था स्वत:च्या धर्माविषयी, सुधारणेचा विरोधक आणि अंगी वृत्ती प्रतिगामी मुसलमानेतराविषयी तिरस्कार आणि राजनिष्ठा मुसलमान राज्य करीत असलेल्या देशाशी हे माझं आकलन मी देशासमोर ठेवलय. त्याचं काय करायचं आणि काय नाही हे देशानं ठरवायचं आहे.'[१८]

गांधीजींच्या मताप्रमाणं त्यांना अखंड हिंदुस्थान हवा आहे आणि आंबेडकरांचे म्हणणे आहे अखंड हिंदुस्थान कधी एकजीव होणार नाही. बळजबरीन केलेली एकी प्रगतीला अडथळा करील. अशा विचाराने विदुषक गोंधळून जातो व आंबेडकरांना तुमच्या मनात काही वेगळा डाव तर नाही ना असा प्रश्न विचारतो. पाकिस्तानला पाठींबा देऊन तुमचा मार्ग मोकळा करून घ्यायचा नाही ना. याविषयी आंबेडकर म्हणतात, ''अरे वेड्या

चातुर्वर्ण नष्ट करून या देशात एकच वर्ग निर्माण करून स्वतंत्र समतेचं रूप पाहणारा मी, मीच दलितस्थानचा कलंक घेऊन मिरवेन.''[१९]

देशातला सामान्यातला सामान्य माणूस सुखात जगला पाहिजे असे आंबेडकरांना वाटते आणि त्यासाठी राजकीय सत्ता त्याच्या हाती येण्यासाठी तो शिकला पाहिजे. स्त्री शिकली पाहिजे, सबला झाली पाहिजे हे सगळं व्हायचं असेल तर समाज सतत प्रयोगशील मन:स्थितीत असला पाहिजे आणि गांधी वादापासून दूर असला पाहिजे. माणसाला त्याच्या गुलामगिरीची जाणीव झाली पाहिजे तो बंड करून उठला पाहिजे आणि त्याने त्यासाठी विचार केला पाहिजे व आपल्या जीवनाचे शिल्पकार व्हायचं की नाही हे त्यानच ठरवायच आहे असे आंबेडकर विदूषकाला सांगतात.

तुर्ततरी गांधीजीच्या जीवाचं काय? विदुषकाला विचार पडला आंबेडकर सांगतात त्यांना उपोषणाची सवय आहे. खरं तर चिंता करण्याची काही गरज नाही. मी तरी आता काय करू शकत नाही. माझ्या हाती जेव्हा जीव वाचविण्याची संधी होती तेव्हा माझ्या समाजाच्या हितावर तिलांजली देऊन वाचवला. उपोषण ही गांधीजीच्या आतल्या आवाजाची गोष्ट आहे.

विधीमंडळाच्या निवडणुकीत डॉ. आंबेडकरांच्या पक्षाचा पार धुव्वा उडाला म्हणून गांधीजींना आनंद होतो. ज्या व्यक्तीने आपणाला १५-१६ वर्षे छळलं. जेव्हा पकडता येईल तेव्हा खिंडीत पकडल. मुस्लिमांची बाजू बळकट करतो. मग त्याच्या पराभवानं आनंद होऊ नये का मला? गांधीजी विदुषकाला सांगतात, हा माणूस पत्र पाठवतो मला, ''जर हिंदी राजकीय ध्येये गाठायचे असेल तर हिंदू-मुस्लिम प्रश्नाच्या निर्णयाबरोबर स्पृश्य-अस्पृश्य प्रश्नाचाही निर्णय आवश्यक आहे.''[२०] पुणे कराराचा अपमान मी विसरलो नाही. फार मोठी किंमत मोजली आहे मी त्यावेळी.

आंबेडकर आणि गांधीजी एकमेकांचे प्रतिस्पर्धी असल्यामुळे पुणे कराराचा प्रसंग ते विसरू शकले नाहीत आणि दोघांनीही आपण आपल्या मताचा, इच्छेचा आणि आपल्या समाजाच्या हिताचा त्याग केला आहे. पण विदूषक गांधीना म्हणतो असेच तुम्ही जीनाविषयी वागा आणि सांगा जीनाला बाबारे पाकिस्तानचा आग्रह सोडून दे.

पाकिस्तान हे वेगळं राष्ट्र आहे. जे जीना सर्व जगाला सांगत आहे. ते तुमच्या विनवणीला भीक घालणार नाहीत. आंबेडकरच उपयोगी पडले असते. देशाचं अखंडत्वं राखताना जीनांना जसा वेगळा पाकिस्तान पाहिजे तसा आंबेडकरांना नाही वेगळी भूमी पाहिजे. त्यांना हवे आहेत फक्त समान हक्क आणि त्यांना जवळ करायचं सोडून तुम्ही जीनांना चूचकारत बसलाय असे विदूषक गांधीजींना म्हणतो आणि निघून जातो. त्याचे बोलणेही ऐकून घेत नाही. एकटेच चिंतामग्न गांधीजी आपला भूतकाळ आठवतात. आफ्रिकेपासून ते आतापर्यंत घडलेल्या घटनांचा हिशोब करतात. पण लखनौ करारापासून चालत आलेलं हे मुस्लिम धार्जिण राजकारण, ते का समजून घेत नाही कुणीच? मुस्लिमांची विभक्त संघाची मागणीला गोखल्याचा विरोध नव्हताच. जीनाना फाळणीच हवी आहे. फाळणी टाळायची तर मुस्लिमांसकट सावरकर, आंबेडकर यांनाही केलं पाहिजे जवळ. अशा विचारांनी गांधीजी चिंतामग्न होतात.

सुभाषचंद्र बोस यांच्या इच्छेप्रमाणं घडलं असत तर हा देश इंग्रजाच्या मगरमिठीतून कधीच मुक्त झाला असता. असे आंबेडकरांना वाटते. पण त्याचवेळी तो हिटलरसारख्या झोटींगशहाच्या हाती पडला असता, पार वाट लागली असती या देशाची. पण सुदैव! हिटलर अखेर मेला आपल्या मरणानं यानंतर विदूषक आणि आंबेडकर यांच्या विधीमंडळाच्या झालेल्या पराभवावर चर्चा होते आणि शेवटी आंबेडकर उदास होतात. ''मी का करतो दलितांचे राजकारण? मला दुसरं काहीच जमत नाही म्हणून? गेली हजारो वर्षे अज्ञानाच्या खाईत होरपळत पडलेल्या या समाजाला नव्या जाणीवेची उभारी द्यायची असेल तर मला हे केलच पाहिजे.''[२१] असे आंबेडकर विदुषकाला सांगतात.

जीना आपल्या मुस्लिम बांधवांना पाकिस्तान मिळवण्यासाठी भाषण देत आहेत. त्यांच्या सांगण्यावरून हिंदु-मुस्लिम दंगल उसळते आणि ही दंगल होऊ नये, शांत व्हावी व सर्वांचे प्राण वाचावे म्हणून महात्मा गांधी उपोषणाला बसतात. शेवटी दंगल थांबते. सर्वांचे प्राण वाचतात. पाकिस्तान वेगळा करायचा म्हणजे सर्व मुसलमान पाकिस्तानात पाठवायचे आणि सर्व हिंदू हिंदुस्थानात आणायचे आंबेडकरांच्या मताशी गांधीजी सहमत नसतात. हा देश सर्वांचा आहे. त्याविषयी गांधी म्हणतात,

विदूषक : अयोग्य होती, डॉ. आंबेडकरांची सूचना ?

गांधी : नसेलही, पण लक्षात ठेव, जे; जे इथं जन्मले, वाढले आणि ज्यांची दृष्टी अन्य कुठल्याही देशाकडे नाही. अशा सर्व लोकांचा हा भारत देश आहे. तो जितका हिंदूचा आहे, तितकाच तो पारश्यांचा, ज्युंचा, ख्रिश्चनांचा, मुसलमानांचा नि अन्य सर्व अहिंदुचा आहे. हे बघ विदूषका स्वतंत्र भारताच राज्य हे हिंदूराज्य नसून भारतीय राज्य आहे. डॉ. आंबेडकरांच्या सुचनेनुसार हिंदुना भारतात आणणं नि मुसलमानांना पाकिस्तानात पाठवणं म्हणजे एकप्रकारे त्या मुलांना आईपासून वंचित करण्यासारखं आहे.[२२]

शेवटी पाकिस्तान वेगळा होतो. सर्व शिष्य आंबेडकरांच्या वाटेने गेले असे गांधींना वाटते. देश स्वतंत्र झाला पाकिस्तान वेगळा झाला. पुढे देशाच्या घटना समितीवर डॉ. आंबेडकरांची निवड होते. दलितांच्या दृष्टीने ते खूप महत्त्वाचे असते. परदेशातील व्यक्तिकडून घटना लिहुन घेण्यास गांधीनी विरोध केला. आणि देशाची नस आणि नस जाणणारी व्यक्ती डॉ. आंबेडकरांची घटना लिहण्यासाठी शिफारस केली पण आंबेडकरांनी राष्ट्रीय ध्वजावर मध्य ठिकाणी अशोकचक्र आणून आपली इच्छा हाणून पाडली असे गांधीजी म्हणतात. पाकिस्तानला ठरल्याप्रमाणे ५५ कोटी रुपये द्यावेत यासाठी गांधीजी पुन्हा उपोषणाला बसतात. तेव्हा सर्वजण जनता गांधीजी मुर्दाबाद म्हणते तशाप्रकारच्या घोषणा देते. गांधीजीको मरणे दो. असे म्हणतात. सर्व लोक आक्रमक बनतात. पण काही काळाने घोषणेचे रुप बदलते, गांधीजी अमर रहे, म. गांधी जिंदाबाद अशा घोषणा ऐंकू येतात.

विदूषक गांधीजींकडे पळत येतो. महात्म्या तू जिंकलास, पाकिस्तानला पच्चावण्ण कोटी देणार. मुस्लिमांच्या मशिदी परत करणार आणि सगळे प्रेमाने राहणार.

गांधीजींनी आपल्या उपोषणानं सर्वांना नमवलेलं असत, अगदी कट्टर आंबेडकरांनाही त्याविषयी एकेठिकाणी विदूषक म्हणतो,

''डॉ. आंबेडकरांसारख्या कठोर जिद्दी माणसालाही नमवलत तुम्ही आणि केलत सिद्ध एक जगावेगळं अस्त्र अहिंसक, जे रक्ताचा थेंबही न सांडता शत्रूला करतं नामोहरम! अशा या अस्त्राचा वापर का नाही केला. जेव्हा रचला जात होता कट देशाच्या फाळणीचा?

इंग्रजांच्या फोडा आणि झोडा या नीतीच्या उडल्या असत्या ठिकऱ्या, जीना झाले असते भुईसपाट नि ते तुमचे शिष्य, तुम्हाला भंग्याचीही किंमत न देणारे झाले असते लीन तुमच्या पायाशी आणि टळली असती फाळणी या देशाची. पण तुम्ही का नाही वापरलत हे उपोषणाचं अस्त्र, फक्त नेमकं त्याच वेळी?''[२३]

अशाप्रकारची खंत विदूषक गांधीजीजवळ व्यक्त करतो. प्रार्थनेची वेळ झालेली असते विदुषक गांधीजीना प्रार्थनेला घेऊन जात असताना वाटेत नथुराम गोडसे येतो व योग्य वाटणाऱ्या सेवेसाठी नमस्कार करतो व अयोग्य अशा वर्तनासाठी...

गांधीजीचा खून होतो.

(सगळीकडे गोंधळ उडतो. गोंधळ वाढत जातो ... प्रकाश येतो त्या वेळी दिसत पांढऱ्या वस्त्रातील गांधीजींच पार्थिव शरीर, बाजूला चरखा, विदूषक उदास बसलेला डॉ. आंबेडकर येतात, ओंजळीत फुलं)

डॉ. आंबेडकर काहीही बोलत नाहीत. शांत फुले वाहतात आणि दूर जाऊन बसतात. त्यावेळी विदूषक आंबेडकरांवर खूप आरोप करीत असतो.

उदा. - ''घुबडासारख्या, अपवित्र, अशुभ माणसांच शेवटच दर्शन घेताना खूप यातना होत असतील डॉक्टरसाहेब?''

''आपला शत्रू काहीही न करता परस्पर नाहीसा झाला या जगातून हे पाहून खूप आनंद झाला असेल नाही डॉक्टरसाहेब तुम्हाला?''[२४]

अशा या जीवघेण्या प्रहारावर आंबेडकर काहीही बोलत नाहीत. गप्प बसतात व नंतर मी बुद्धाला शरण आहे असे म्हणतात. आजवर गांधी-आंबेडकरांचे संबंध पाहता आंबेडकरांचं गांधीजींच्या पार्थिवाकडे जाणंदेखील एक नाटक वाटलं असाव पण गांधीजी नेहमीच आंबेडकरांना विरोध वागले असे आंबेडकर म्हणतात. परंतु गांधींचा असा अंत व्हायला नको होता. आणि तोही एका ब्राह्मणान करायला नको होता का कुणास ठाऊक गांधीजी नेहमीच मुसलमानांच्या बाजूने उभे असत आणि नेमकं हेच त्या हिंदू राष्ट्रावाद्यांना सहन झालं नाही आणि मी म्हटल होत गांधीजींना एकदा, ''जोवर जपत आहात हितसंबंध

ब्राह्मणांचे जीवाच्या आकांतान, तोवर तुमच्या महात्मेपणाला धोका नाही, पण ज्या दिवशी तुम्ही ब्राह्मणांच्या हिताला बाधा आणू पहाल, त्या दिवशी ....''[२५]

विदूषक डॉ. आंबेडकरांची क्षमा मागतो, डॉ. आंबेडकर त्याला जवळ घेतात थोपटतात आणि म्हणतात,

आंबेडकर : ही तर केवळ सुरूवात आहे विदुषका, जातीयवादी राजकारणाची. माणसांमाणसात जात्यंधतेच विष पेरणारं हे राजकारण थांबल पाहिजे त्वरीत. ही भूमी जगाच्या पाठीवर ताठ मानेन उभी रहावी असं वाटत असेल तर आपल्या जातीपेक्षा, जमातीपेक्षा आणि विचारसरणीपेक्षा आपल्या हृदयात सर्वोच्च स्थान दिलं पाहिजे ते केवळ देशप्रेमाला. आपली जात, आपला धर्म, आपली भाषा, आपला प्रांत वगैरे, कल्पनांना तिलांजली देवून प्रत्येकानं शपथ घेतली पाहिजे की, मी प्रथम भारतीय आहे आणि अंतीही भारतीय असेन पण जर ते आपण करू शकलो नाही तर... मला भिती वाटतेय... मला भिती वाटतेय की, हे जाती-जातीचं राजकारण आपल्या स्वार्थासाठी निर्माण करीत राहील. जाती-धर्मात तणाव, प्रसंग, दंगली, जाळपोळ, लूटालूट आणि त्यात बळी कसलाही दोष नसलेल्या निष्पाप जीवांचा. हे होता कामा नये, हे...

ओम् मणि पद्मेंह !

ओम् मणि पद्मेंह !

ओम् मणि पद्मेंह ![२६]

(अशाप्रकारे आंबेडकर स्वत:शी लीन होतात)

अशाप्रकारे आंबेडकर विदुषकाला सांगतात. पडदा पडू लागतो तोपर्यंत विदूषक जाणाऱ्या माणसाला थांबवून उपदेश देतो.

''इतिहास जागवणारेच इतिहास घडवत असतात.

इतिहास जागवणारे ... जागे व्हा.

जागवा माणूस, जगवा माणूस... जागवा सारं

चराचर जागवा... जागे व्हा.... काय?"[२७]

आणि पुढे बोलत असतानाच पडदा पडतो. अशाप्रकारे 'गांधी-आंबेडकर' प्रेमानंद गज्वी यांच्या नाटकातील हे कथानक आहे. इतिहासासाठी निगडीत हे नाटक असले तरी लेखकाने या नाटकातील कथानकामध्ये कसलीही कसर सोडली नाही. या नाटकात लेखकाने व्यक्तिरेखाची गर्दी न करता कथानक मांडले आहे आणि तरीही कोणतीही उणिव जाणवत नाही. कथानकाची मांडणी करीत असताना अगदी योग्य वेळी विदूषकाची भूमिका घेवून नाटकाचे कथानक गतिमान ठेवले आहे. इतिहासातील प्रसंगाना कोणताही तडा न जाऊ देता अगदी समर्थपणे नाटकाचे कथानक पूर्ण केले आहे आणि नाटकाचा दर्जा उंचावण्याच काम केले आहे. कोणत्याही नाटकाचे कथानक खूप महत्त्वाचे असते. त्याबरोबर कमी पात्रात त्याची मांडणी यशस्वी करणे खूपच महत्त्वाचे असते आणि ते सर्व या नाटकात लेखकाने केलेले आहे. आणि म्हणूनच या नाटकाने उच्च दर्जा मिळविला आहे.

## प्रेमानंद गज्वी यांच्या नाटकातील व्यक्तिरेखा :

नाटकामध्ये कथानकाबरोबर व्यक्तिरेखाही खूप महत्त्वाच्या असतात. नाटकात प्रमुख, दुय्यम, नगण्य अशा स्वरूपाच्या व्यक्तिरेखा असतात. अशाप्रकारच्या सर्व व्यक्तिरेखांचे चित्रण नाटककारास कलात्मकतेने करावे लागते. नाटककार वेगवेगळ्या निवडक स्वभावाच्या ठासीव, वैशिष्ट्यपूर्ण स्वाभाविक आणि दीर्घकाळ स्मरणात राहतील अशा व्यक्तिरेखांचे रेखाटन करीत असतो. याही नाटकात लेखकाने अशाच व्यक्तिरेखांचे चित्रण केलेले आहे.

### गांधी :

प्रेमानंद गज्वी यांच्या 'गांधी-आंबेडकर' या नाटकातील गांधीजी एक महत्त्वाची व्यक्तिरेखा आहे. गांधीजी देशाच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण व्यक्ति असल्यामुळे आणि देश स्वातंत्र्यासाठी प्रमुख सेनापती म्हणून इंग्रजाशी लढ्यामुळे ते देशाचे राष्ट्रपिता झाले आहेत. असे हे पात्र या नाटकामध्ये इतिहासाप्रमाणेच या नाटकातही

आंबेडकरांबरोबर संघर्ष करणारे आहे. गांधीजी आणि आंबेडकर हे एकमेकांचे प्रतिस्पर्धी आहेत. गांधीजी अस्पृश्यांच्या उद्धारासाठी आंबेडकरांच्या जन्मापूर्वीपासून कार्य करीत आहेत. याची जाणीव ते आंबेडकरांना करून देतात. त्यामुळे अस्पृश्यांचा खरा प्रतिनिधी मी असताना दुसरा कशाला असाही प्रश्न उपस्थित करतात आणि आपण देशाचे, काँग्रेसचे, अस्पृश्यांचे उद्धारक आहोत याची जाणीव करून देतात.

आंबेडकर अस्पृश्यासाठी 'स्वतंत्र मतदार संघ' इंग्रजांकडून मिळविला पण गांधीजींचा त्याला प्राणपणाने विरोध केला. त्यासाठी त्यांनी उपोषण धरले आणि आंबेडकरांना 'पुणे करार' करण्यास भाग पाडले. आणि आंबेडकरांचे स्वप्न धुळीस मिळविले. अस्पृश्य समाज हा हिंदू समाजाचा अभिन्न भाग आहे आणि तो हिंदू समाजापासून वेगळा झाल्यास हिंदू समाज भंग पावेल आणि अस्पृश्यही अस्पृश्यच राहतील असे त्यांना वाटते. एखादी गोष्ट आपल्या मनासारखी होत नसल्यास ते स्वत:ला प्रायश्चित म्हणून उपोषणाचा मार्ग अवलंबीत अशी गांधीची व्यक्तिरेखा आहे. पंचमवर्णीय लोक हिंदूधर्माच अविभाज्य अंग आहे. या मताशी ते ठाम आहेत. ते पुढील त्यांच्या बोलण्यावरून लक्षात येते.

गांधी : पंचमवर्णीय लोक हिंदूधर्माच अविभाज्य अंग आहेत. त्यांना वेगळं करणारी कुठलीच कृती मला मान्य नाही. आज पंचमाना वेगळं स्वतंत्र प्रतिनिधीत्व दिलं तर उद्या ब्राह्मण वेगळं प्रतिनिधित्व मागतील, मराठे वेगळं प्रतिनिधीत्व मागतील, प्रत्येक जात वेगळी होईल. प्रत्येक जातीचा सवतासुभा वेगळा उभा राहील.''[२८]

अशा प्रकारची भीती गांधीजींना जाणवते व ते अस्पृश्यांना स्वतंत्र प्रतिनिधीत्व देण्यास नकार देतात. गांधीजी हे सत्याचे पुजारी आहेत. हिंदू धर्माचे चाहते आहेत आणि त्यामुळे हिंदूधर्मातील चातुर्वण पद्धत मोडण्यास ते तयार नाहीत. यावरूनच ते आंबेडकरांशी संघर्ष करतात. नेहमी गांधीजी आपल्या आतल्या आवाजाने ऐकतात व त्यानुसार वागतात. गांधींचा आंबेडकरांशी संघर्ष असला तरी ते नेहमी सौजन्याने बोलतात. ज्यावेळी उपोषण थांबविण्यासाठी आंबेडकर त्यांना भेटाय जातात तेव्हा तेथे त्यांच्या झालेल्या 'पुणे

करारा'नंतर आंबेडकरांचे ऋण व्यक्त करतात. स्वतंत्रता ही अक्षरज्ञानापेक्षा हजारपटीनं बरी असे गांधीजी म्हणतात.

गांधी : जी गोष्ट इतर मुलांना मिळत नसेल ती मी माझ्या मुलांसाठीही इच्छिता कामा नये. खरे तर माझ्या मुलांना मी शिक्षण देऊ शकलो असतो. पण मग, ते जे स्वातंत्रतेचा आणि स्वाभिमानाचा पदार्थपाठ शिकले तो ते शिकू शकले नसते. जेथे स्वतंत्रता आणि अक्षर ज्ञान यांच्यामध्ये पसंती करावयाची असते तेथे स्वतंत्रता अक्षरज्ञानापेक्षा हजारपटीनं बरी''[२१]

असे गांधीजी म्हणतात, सर्वांना समान वागणूक देण्याच्या मताचे ते आहेत. गांधीजी हे संशयी वृत्तीचे आहेत. आपल्या समोरची व्यक्ती आपले म्हणणे मान्य करीत नसेल तर ते प्रत्येकांवर संशय घेत मग त्या ठिकाणी कोणीही असो. आंबेडकर, जीना यांच्या पत्नीही याची जाणीव विदूषक या नाटकामध्ये गांधीना करून देतो व गांधीजी ते मान्यही करतात. आणि या जगात कोण आहे असा विकासमुक्त असेही प्रतिउत्तर देतात. गांधीना आपला देश रामराज्यासारखा बनवायचे स्वप्न आहे. म्हणून ते त्या उद्दिष्टाने प्रयत्न करीत होते. सर्वांना आपल्या आज्ञेत घेण्याचा प्रयत्न करीत होते आणि अखंड हिंदुस्थान बनावा यासाठी प्रयत्न करीत होते. पण मुस्लिम, शिख, ख्रिश्चन यांना दिलेल्या स्वतंत्र मतदार संघामुळे आणि पाकिस्तान फाळणीमुळे ते शक्य झाले नाही. एकाच गोष्टीकडे अनेक दृष्टीने पाण्याची दृष्टी त्यांच्याकडे होती. म्हणून ते विदूषकालाही अनेक दृष्टीने पाहण्याचा सल्ला देतात.

आंबेडकरांच्या धर्मांतराच्या घोषणेने गांधीजी काळजी करतात आणि अस्पृश्यांच्या विकासासाठी, न्यायासाठी धर्मांतर हा शेवटचा पर्याय नव्हे असे आंबेडकरांना सांगतात. धर्म ही काही अंगरख्यासारखी बदलता येण्याची वस्तू नव्हे. त्यामुळे तुम्हाला पाहिजे ते मिळणार नाही. अशाप्रकारे ते आंबेडकरांना समजावण्याचा प्रयत्न करतात. गांधीजी आंबेडकरांच अस्पृश्यतेच दु:ख समजू शकतो. कारण आफ्रिकेत काळा-गोरा अशा प्रकारामुळे हिन वागणूक मिळाली होती. त्याच दु:ख काय असतं यावरून आंबेडकरांना ते सांगतात.

गांधी : दक्षिण आफ्रिकेत असतानाची गोष्ट पहिल्या वर्गाच्या डब्यातून प्रवास करीत होतो मी इतक्यात एक माणूस आला. मला जागा सोडण्यास सांगू लागला. मी जागा सोडत नाही हे पाहून त्यानं एका शिपायाला बोलावून घेतलं माझं सामान खाली फेकलं. मग मला धक्के मारून बाहेर काढलं का? तर मी भारतीय काळा. मी एवढा उच्चविद्याविभुषित बॅरिस्टर पण ते माझी गणणा कुलीमध्ये करायचे. घाव जिव्हारी बसायचा. डॉ. आंबेडकर तुमच दु:ख मी समजू शकतो.''[३०]

अशाप्रकारे गांधीजी आपल्या दु:खावरून दुसऱ्याच्या दु:खाची जाणीव करीत होते ते समजून घेत होते. गांधीजी ब्राह्मण हा गुरू हवाच अशा मताचे होते. ते सर्वांना समान मानत पण धर्म रुढी प्रमाणे ब्राह्मण हा गुरू हवाच असे सांगत. आंबेडकरांशी धर्मावर, अस्पृश्यतेवर चर्चा होत असे तेव्हा ते ब्राह्मण व भंगी मी समान योग्यतेचे मानतो असे सांगत पण देश फाळणीच्या वेळी आपल्या काँग्रेस सहकाऱ्यांशी मला भंग्याएवढीही किंमत दिली नाही असे ते म्हणतात. यावरून त्यांच्या बोलण्यात विसंगती जाणवते. ढोंगीपणा जाणवतो.

देश स्वातंत्र्यासाठी अत्यंत निर्भयतेने जीवाची पर्वा न करता ते इंग्रजाबरोबर लढले आहेत. उपोषणे केली, मिठाचा सत्याग्रह केला, चलेजावची चळवळ केली आणि इंग्रजांना देश सोडून जाण्यास भाग भाग पाडले. जीनानाही पाकिस्तानची मागणी सोडून दे म्हणून खूप समजावले पण ते त्यांना शक्य झाले नाही. हिंदू-मुस्लिम दंगल सुरू झाली तेव्हा ती थांबावी, सर्वांचे प्राण वाचावे म्हणून त्यांनी उपोषण धरले होते. त्यांनी नेहमीच उपोषण हे आपले अस्त्र वापरून प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. इंग्रजांच्या विरोधात अस्पृश्य स्वतंत्र मतदार संघाच्या विरोधात, हिंदू-मुस्लिम दंगलीच्या विरोध, पाकिस्तानला ५५ कोटी रुपये द्यावे यासाठी, त्यांनी उपोषणे करून आपले प्राणपणास लावले आहेत आणि आपल्याला हवी ती गोष्ट साध्य करण्याच्या प्रयत्न केला आहे.

पाकिस्तानची फाळणी झाल्यानंतर त्यांना ५५ कोटी रुपये द्यावे म्हणून उपोषण करून गांधीनी ते द्यायला भाग पाडले. कारण ते फाळणी करताना मान्य केले होते. त्या सत्याशी धरून गांधीजी राहिले आणि म्हणून अखेर नथुराम गोडसे या चितपावन ब्राह्मणाने

त्यांचा तीन गोळ्या घालून खून केला आणि गांधीजी ही व्यक्तिरेखा देशाच्या इतिहासामध्ये अजरामर झाली.

अशाप्रकारे ही व्यक्तिरेखा आहे. त्यांचे कार्य पाहता चांगल्या वाईट गोष्टीचा संगम आपल्याला त्याच्यात दिसतो. पण या महात्म्याने आपल्या उपोषणाच्या अस्त्राने सर्वांना नमविले. अशी ही व्यक्तिरेखा लेखकाने आपल्या नाटकामध्ये योग्यप्रकारे चित्रित केली आहे.

**डॉ. आंबेडकर :**

गांधी-आंबेडकर या वैचारिक संघर्षात्मक नाटकातील आंबेडकर ही दुसरी प्रमुख व्यक्तिरेखा आहे. गांधी-आंबेडकर हे एकमेकाचे प्रतिस्पर्धक आहेत. आपल्या अस्पृश्य बांधवावर पिढ्यात-पिढ्या चालत आलेले अन्याय-अत्याचार यातून त्यांना मुक्त करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणारी डॉ. आंबेडकर ही व्यक्तिरेखा आहे. त्यांना अस्पृश्याच्या हितासाठी उचललेल्या प्रत्येक कार्याला सवर्णांबरोबर संघर्ष करावा लागत आहे. अस्पृश्य निवारण कार्य करीत असताना गांधीजी आणि त्यांची कॉंग्रेस यांच्याबद्दल त्यांच्या खूप तक्रारी आहेत. आणि त्या सोडवण्यास गांधी व कॉंग्रेस असमर्थ ठरले तेव्हा आमचा उद्धार आम्हीच करू असे गांधीना सांगतात. ते स्वत: अस्पृश्याचे प्रतिनिधी म्हणून अस्पृश्यांच्या हक्कासाठी प्रयत्न करीत आहेत. या नाटकातील आंबेडकरांची भूमिका ही विद्रोही स्वरूपाची आहे. अन्याय, अत्याचाराविरुद्ध प्रत्येक ठिकाणी विद्रोह करून न्याय मिळविण्याचा प्रयत्न करणारे पात्र आहे. आंबेडकरांना कलावंताच्या कलेची ताकतही किती असते याची जाणीव आहे. ते म्हणतात 'माझी दहा भाषणे आणि कलावंताचा एक खेळ' समाजाच्या विकासासाठी समान आहे असे म्हणतात.

या नाटकामध्ये आंबेडकरांच्या बोलण्यातून विद्रोहाची भाषा जाणवते ते विदुषकाला म्हणतात.

आंबेडकर : रान जागवून डरकाळ्या फोडणाऱ्या वाघाला कसं जेरबंद करायचं ते ठाऊक आहे मला. शिदनाक रायनाक अशा शुरांचे वंशज आहोत आम्ही.[३१]

अशाप्रकारे ते विद्रोहाची भाषा बोलतात. आंबेडकरांची एक खंत जाणवते या देशाने आम्हाला आपलं कधी म्हणलच नाही. नेहमी आमच्यावर अत्याचार होताना बघत राहीला. गांधीजी अस्पृश्य समाजावर दाईसारख प्रेम करतात असे ते म्हणतात.

आंबेडकरांनी आपल्या अस्पृश्य बांधवासाठी मुस्लिम, शिख, यांच्याप्रमाणे 'स्वतंत्र मदार संघ' मंजूर करून घेतला होता पण म. गांधीनी त्याला प्राणपणाने विरोध केला उपोषणाच्या हत्याराने त्यांना पूणे करार करायला भाग पाडले. आणि त्यांच्यात अस्पृश्य बांधवाच्या हक्कावर व स्वप्नावर पाणी सोडले म्हणून ते म्हणतात गांधीजीचे प्राण वाचविण्यासाठी मी माझ्या समाजाच्या हिताचा खूप मोठा त्याग दिला आहे. ते म्हणतात,

आंबेडकर : 'होय, आणि म्हणूनच मी इथे आलो. जसा तुमचा जीव महत्त्वाचा आहे. मी तुमचा जीव वाचवतो तुम्ही माझ्या समाजाला वाचवा. ज्या सन्मानान इथला सवर्ण माणूस आपलं जीवन जगतो आहे त्याच सन्मानान माझा समाज जगला पाहिजे'[३२]

आपला अस्पृश्य समाज जो हजारों वर्ष खितपत पडला आहे तो सर्वासारखा सन्मानन जगला पाहिजे. त्यासाठी ते नेहमी प्रयत्न करतात. ज्यावेळी अभ्यासाअंती हिंदू समाजामध्ये आपला उद्धार होणार नाही आपल्याला न्याय मिळणार नाही, तो धर्म आपणाला समान वागणूक देणार नाही अशी खात्री झाल्यानंतर आंबेडकरांनी आपली धर्मांतराची घोषणा जाहीर केली व धर्मांतर करण्यासाठीही गांधीजींचा विरोध होता. धर्मांतर करू नये अशी त्यांची इच्छा होती. पण गांधीजी आंबेडकरांना खूप समजावयाचा प्रयत्न करतात. तेव्हा आंबेडकर गांधीजीना एक अट घालतात.

गांधी : होय, ठाऊक आहे मला केसरी.

आंबेडकर : ज्या लोकमान्य टिळकांना राजकीय वारसा तुम्ही चालवत आहात, त्या टिळकांच्या केसरीच्या मतप्रणालीनुसार के. के. सकट नावाचे मातंग गृहस्थ एक आदर्श हिंदू आहेत. त्या संकटांना वर्षभर गादीवर बसवा. सामाजिक समता मान्य असल्याबद्दल नि हृदयपालटाचा निदर्शक म्हणून शंभर एक ब्राह्मण कुटुंबांना संकटांच्या पाया पडण्यास लावा आणि हिंदू धर्मात

अस्पृश्यतेला स्थान नाही हे सिद्ध करा. मी मुळीच धर्मांतर करणार नाही. येतो मी (डॉ. आंबेडकर जातात)[३३]

अशाप्रकारे धर्मातर न करण्याच्या संदर्भात आंबेडकर गांधीजींना अट घालतात तेव्हा गांधीजी चिंतामग्न होतात. आंबेडकर ही व्यक्तीरेखा आपल्या समाजाच्या विकासासाठी, उद्धारासाठी समाजातील सर्वांना शिकण्याचा, संघटीत होण्याचा सल्ला देत होती. शिक्षणाशिवाय अस्पृश्यांचा उद्धार नाही आणि देशातील राज्यकर्ते व्हायचे असेल तर शिक्षण घेतले पाहिजे. असे त्यांचे मत होते.

ब्रिटीश सरकारने त्यांच्या मंत्रिमंडळात डॉ. आंबेडकरांना मजुरमंत्री या पदावर घेतले होते. पण कामगारांचे हित लक्षात घेऊन डॉ. आंबेडकर त्या पदावर गेले होते. असे ते विदुषकाला स्पष्ट सांगतात. इंग्रजांना या देशातून हाकलून दिल पाहिजे अशी त्यांचीही इच्छा आहे. पण गांधीजींच्या हेखेखोर स्वभावामुळे आली सत्ता आपणालाच मिळावी, आपलाच गौरव व्हावा अशी गांधींची इच्छा असेल तर ते करण्यास त्यांना इतरांकडून सहकार्य मिळणार नाही. असे आंबेडकर सांगतात. मुसलमानांना त्यांचा पाकिस्तान देऊन टाकावा असेही आंबेडकर म्हणतात. कारण बळजबरीने केलेली एकी प्रगतीला अडथळा करील. अशा प्रकारचा विचार करण्याची दूरदृष्टी आहे हे दिसून येते. डॉ. आंबेडकर ही व्यक्तिरेखा चातुर्वर्ण्य व्यवस्था नष्ट करून या देशात एकच वर्ण निर्माण करून सर्वत्र समतेचं रूप पाहणारी व्यक्तिरेखा आहे. सन्मानपूर्वक जगण्यासाठी धर्मांतर आवश्यक आहे असे आंबेडकर म्हणतात. आपली जमात राजकर्ती जमात झाली पाहिजे असे त्यांना वाटते. आंबेडकर ही व्यक्तिरेखा माणसाला विचार करायला लावते. माणूस जागा करण्याचं काम करते. विदूषकाला ते म्हणतात,

आंबेडकर : माणसाला त्याच्या गुलामगिरीची जाणीव करून दिली की तो बंड करून उठेल आणि तसं झालं की, माणूस जागा होईल, विचार करील की, त्याची ही दैना कुणी केली?

विदूषक : मग ?

आंबेडकर : स्वत:च्या जीवनाचा शिल्पकार व्हायचं की नाही ते त्याचं तो ठरवील.[३४]

डॉ. आंबेडकरांचा प्रांतिक विधिमंडळाच्या निवडणूकीत पराभव झाल्यानंतर काय होणार या देशाचं अशी चिंता व्यक्त करतात. पराभवाचं कारण सांगताना म्हणतात. 'आमचीच मत विभागलेली. आमची काही मंडळी कॉंग्रेसमध्ये गेली, जगताहेत दाईच्या मायेवर!' स्वत:ला प्रश्न विचारताना म्हणतात, 'का करतो मी दलितांच राजकारण मला दुसरं काही येत नाही म्हणून' पुन्हा विचार करतात. म्हणतात, ''गेली हजारो वर्षे अज्ञानाच्या खाईत होरपळत पडलेल्या या समाजाला नव्या जाणीवेची उभारी द्यायची असेल तर, मला हे केलच पाहिजे.'' अशाप्रकारे आपला समाज सुधारणेचा विचार करतात. त्यांच्या विद्वत्तेमुळे त्यांना घटना समतीवर घेतले जाते. घटना लिहण्याच काम त्यांच्याकडे सोपविलं जात. दलितांच्या दृष्टीने घटना समीतीवर त्यांच असणं खूप महत्त्वाच होतं हे त्यांनाही माहित होते.

आपला प्रतिस्पर्धी गांधीजींची हत्या झाल्यानंतर दु:ख व्यक्त करतात. त्यांच्या खुनाची बातमी ऐकून सुन्न होतात. त्यांच्या पार्थिवावर प्रामाणिकपणे फुले वाहतात. ते म्हणतात गांधी व माझ्यात संघर्ष होता, शत्रुत्व होते पण ते नेहमीच माझ्याशी तसे वागत आले. त्यानी प्रत्येकवेळी माझ्याशी खेळी केली, केला मला प्रयत्न संपविण्याचा, असो! शेवटी हे आहे राजकारण. ''गांधींचा खून झाल्यानंतर खेद होत असताना ज्युलिअस सीझरच्या खुनानंतर सिसेरोनं काढलेल्या त्या उद्‌गाराची आठवण मला झाली. गांधीपासून या देशाला एक धोका निर्माण झाला होता. त्यांनी मुक्त विचाराचा कोंडमारा निर्माण केला होता. आजवर लोक एका महात्म्याचे गुलाम बनले होते. या गुलामगिरीतून आता मुक्त होतील आणि आपल्या गुणांच्या जोरावर आपल्या पायावर उभे राहतील. पण तरीही एक शल्य बोचत आहे. गांधींजीचा असा दारूण अंत व्हायला नको होता.''[३५]

असे परखड मत डॉ. आंबेडकर मांडतात. अशाप्रकारे डॉ. आंबेडकर ही व्यक्तिरेखा देशाच्या विकासाचा आणि प्रगतीचा विचार करून प्रत्येकान वागलं पाहिजे असा संदेश देते. अशी ही या नाटकातील महत्त्वपूर्ण प्रमुख व्यक्तिरेखा आहे.

**विदूषक :**

'गांधी-आंबेडकर' हे नाटक लिहीत असताना प्रेमानंद गज्वी यांनी जी सर्कस करावी लागली त्या सर्कसीतील ह्या झुल्यावरून त्या झुल्यावर झुलणारा हा विदूषक आहे. विदूषक हे पात्र या नाटकासाठी एकप्रकारची संजीवनी आहे. नाटकामध्ये जिवंतपणा आणण्याच काम हे विदूषक नावाच्या व्यक्तिरेखेने केले आहे. विदूषक हा सर्वांना माहित आहे तो आपल्या दिसण्याने, अंगविक्षेपाने आणि हालचालीने हसवतो, रडवितो, गंभीरही करतो असा हा विदूषक या नाटकाचा महत्त्वाचा सूत्रधार आहे. त्याशिवाय हे नाटक अपूर्ण आहे. इतिहासातील गांधी-आंबेडकर या महामानवाना त्यांच्या वागण्याने सामान्य माणसाच्या मनात निर्माण होणारे प्रश्न विचारण्याचं काम विदूषक करतो आहे. विदूषक व्यक्तिरेखेविषयी लेखक म्हणतो, ''पुरता कंटाळून गेलो, 'हा नाद सोड' अशी टोचणी सुरू झाली आणि अकस्मात शंकासुराच्या जागी मला विदूषक दिसू लागला... सर्कशीतील विदूषक गोळ खेळणारा, लोमर रूप, खेळकर मनोरंजन करणारं पण तरीही हा विदूषक मला अभिप्रेत विदूषक नव्हता. जितका तो खेळकर तितकाच तो गंभीर प्रवृत्तीचा हवा होता आणि ती सोय मुळातच लवचिक असणाऱ्या विदूषकान सर्वार्थान पूर्ण केली. विदूषक गवसला नसता तर मी हे नाटक मुळीच लिहू शकलो नसतो. विदूषका तुला लाख; लाख सलाम. खरंच विदुषका, तूच सुत्रधार, तूच कोरस, तूच गांधी-आंबेडकरांचे मन आणि तूच भाष्यकार. तुला पुन्हा एकदा सलाम.''[३६] अशाप्रकारे लेखक आपले मत व्यक्त करतो यावरून विदूषक ही व्यक्तिरेखा या नाटकात किती महत्त्वाची आहे हे दिसून येते. विदूषकाने या नाटकात आपली भूमिका चोख बजावली आहे. नाटकाची सुरूवात तालबद्ध लयीवर विदुषकाच्या नाचण्याने होते आणि नंतर बोलता-बालता गांधी-आंबेडकरांना आपल्या खेळात सामील करून घेतो व त्यांच्या अस्पृश्यता निवारण, देशाची फाळणी, सत्याग्रह, उपोषण अशा विषयावर प्रश्नात्मक चर्चा करतो, कधी चिडवून बोलतो, कधी व्याकुळ होतो. कधी आत्मीयतेने घरच्यांविषयी प्रश्न विचारतो. असा हा विदूषक या नाटकात आपणाला गांधी-आंबेडकरांबरोबर दिसतो. त्यांना प्रश्न विचारताना दिसतो.

गांधी : आतला आवाज! तू... अरे म्हणजे मी तुला ओळखूही शकलो नाही?

विदूषक : एकसारख्या त्या आंबेडकरांचाच विचार करीत बसल्यावर दुसर काय होणार? तरी बरं मी आधीच बजावलं होत की, डॉ. आंबेडकरांच्या भेटीला बोलावता हे ठिक ! पण जरा सांभाळून, बघता-बघता करून गेले न तुमची पंचाईत! आजवर तुम्हाला गुणी काही बोलण्याची हिम्मत केली होती? तुमचं सार महालेपण धुळीस मिळवून गेले. आमास म्हणाले, डॉ. आंबेडकरांचा जन्मही झाला नव्हता तेव्हापासून तुम्ही पंचमवर्णीयांच्या प्रश्नावर विचार करीत आलात. तरी तो विचार केवळ आमास ठरावा? तुम्ही एकदा म्हटलं होत ना, पंचमाचा नेता होईल असा एकही पुढारी त्यांच्यात दिसत नाही. मग आता काय मत आहे?[३७]

अशाप्रकारे गांधीजींना प्रश्न विचारून, चिडवून त्यांची धांदल उडवतो जे कोणीही आजपर्यंत अशाप्रकारे त्यांना बोलले नाही ते विदूषक त्यांना बोलतो व एक वेगळेपण या नाटकाबद्दल सिद्ध करतो. अशाप्रकारचे अनेक प्रसंग या नाटकात पाहायला मिळतील. या गांधी-आंबेडकर संघर्षात विदूषक डोकावून त्यांना प्रश्न विचारील आणि त्याच्याकडून उत्तरे मिळवील.

उदा. -

विदूषक : काय तुम्ही भाडलात?

आंबेडकर : होय अगदी सामान्य माणसासारखं

विदूषक : तुमच्यासारखी अशी थोर माणसं... ते गांधीजीसुद्धा असेच भांडले होते. कस्तुरबा बरोबर आणि रागाच्या भरात घराबाहेर काढायला निघाले होते. जगाला न्याय मिळवून देण्यासाठी धडपडणारी ही माणसं कळत नाही का भांडतात. आपल्याच माणसांशी अगदी सामान्य माणसासारखी?... माणूस मुलतःच सामान्य असला पाहिजे, अगदी सामान्य सर्व विकारासह जगणारा. भलेही होवो मग तो ज्ञानी, शिकून ग्रंथ वाचून... डॉक्टरसाहेब एक विचारू?

आंबेडकर : विचार

विदूषक : तुम्ही एवढे शिकलात, जगातील सर्वोत्तम ज्ञान मिळविण्यासाठी अमेरिकेला गेलात. विलायतेला जात राहिलात; पुन्हा पुन्हा गोळा केले हजारो ग्रंथ. ते ठेवण्यासाठी अगदी ठरवून दादरच्या हिंदू कॉलनीत घर बांधलत. तेही वास्तूशास्त्राचा अभ्यास करून. नाव ठेवलत राजगृह. ग्रंथासाठी घर बांधणारा थोर विद्वान असा लौकीक मिळविला. पण आपल्या पत्नीनेही वाचावेत ते ग्रंथ. व्हावी तीही ज्ञानी आणि राहवी उभी चळवळीत खांद्याला खांदा देऊन असा विचार नाही आला मनात?[३८]

अशाप्रकारचे एक ना अनेक प्रश्न विदूषक महापुरूषांना विचारतो आहे.

गांधीजी-आंबेडकर यांच्यावर विदूषक बिनधास्त आरोप करतो आहे. गांधींना म्हणतो तुम्ही संशयी आहात, आंबेडकरांवर कुरघोड्या करता, जीनांशी वैर करता सर्वांविषयी मनात संशय घेता. उपोषणाच्या वेळी सारा देश महात्माजींची काळजी करीत आहे. तेव्हा विदूषक आंबेडकरांना म्हणतो.

विदूषक : वेडापणा? देश इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी तो महात्मा स्वत:चा जीव संकटात टाकून बसलाय. काय होणार या महात्म्याचं म्हणून सारा देश चिंतातूर झालाय नी तुम्ही मात्र ...[३९] त्याच्या या बोलण्यातून तो डॉ. आंबेडकरांना अप्रत्यक्ष विचारतो आहे, तुम्हाला गांधींची, देशाची कसलीच काळजी नाही का तुम्ही मात्र निवांत आहात. अशाप्रकारे त्याला म्हणायचे आहे.

अशाप्रकारे विदूषक हा आपल्या बोलण्यातून नाटकाची वातावरण निर्मिती करतो आहे. पाकिस्तान फाळणीच्यावेळी हिंदू-मुस्लिम दंगल होते तेव्हा विदूषक म्हणतो, 'अरे कुणीतरी थांबवा आवरा यांना, असा आक्रोश करतो.' गांधीजीनी उपोषण सोडावे म्हणून डोकेही आपटून घेतो. असा हा विदूषक आहे. गांधी-आंबेडकरांच्या या कथानकाच्या इतिहासातील त्यांच्या सोबत असणाऱ्या इतर पात्राची उणिवही विदूषक ही व्यक्तिरेखा होऊ देत नाही. असा हा विदूषक गांधीजींच्या खुनानंतर डॉ. आंबेडकरांवर जीवघेणे आरोप करतो आणि आंबेडकरांच्या स्पष्टीकरणानंतर क्षमाही मागतो असा हा बहुरंगी विदूषक या नाटकाचा खरा सूत्रधार आहे. हे या नाटकात दिसून येते.

**प्रेमानंद गज्वी यांच्या नाटकातील संवाद :**

कोणत्याही नाटकात संवादाला खूप महत्त्व असते. संवाद हा त्या नाटकाचा दर्जा ठरवितो. दर्जेदार संवाद ज्या नाटकात असतात ते नाटक प्रेक्षकांच्या मनावर परिणाम करते व त्यामुळे त्या नाटकाचा दर्जा टिकून राहतो. उदा. - 'नटसम्राट' सारखे नाटक त्यातील असणारे संवाद हे खूप दर्जेदार असल्याने माणसाच्या मनावर ते खूप परिणामकारक ठरतात.

अशाचप्रकारे 'गांधी-आंबेडकर' या नाटकातील संवाद हे ही खूप महत्त्वाचे आहेत. लेखकाने नाटकात गांधी-आंबेडकर आणि विदूषक अशा तिघामध्ये नाटकाचे संवाद घडवून आणले आहेत. त्यातील विदूषक हा आपल्या प्रश्नरूपी संवादाने सर्वांचे मन जिंकतो. त्याचे संवाद हे नेहमी गांधी-आंबेडकरांना प्रश्न विचारूनच घेतात तो आपल्या भुमीकेतून संवाद करीत असताना गांधी-आंबेडकर हे नाटक जरी ऐतिहासिक विषयावर असले तरी लेखकाने या इतिहासातील विषयाला धरून गांधी-आंबेडकर-विदूषक अशी वेगळी रचना निर्माण करुण त्यांच्यामध्ये संवाद घडवून आणले आहेत. गांधी-आंबेडकरांमधला दुवा म्हणजे विदूषक आहे. आपल्या बोलण्यातील संवादाने तो त्यांना प्रश्न विचारतो आणि त्यांना उत्तरे देण्यास भाग पाडतो. गांधी-विदूषकाच्या पुढील संवादावरून ते आपल्या लक्षात येईल.

विदूषक : तुम्ही जे काय चालवलत महात्माजी?

गांधी : माझ्या मनाविरुद्ध घडलेल्या गोष्टीच प्रायश्चित मी घेऊ नये की काय विदूषका? तुला तर ठाऊकच आहे. जिवाच्या आकांतानं मी विरोध केला तरीही सरकारनं पंचमांना स्वतंत्र मतदार संघ दिलाच.

विदूषक : म्हणून सुरू केलत हे आमरण उपोषण?

गांधी : माझ्या अंतरात्म्याच्या शुद्धीसाठी मी हे...

विदूषक : आंतरिक शुद्धीसाठी की राजकीय अपयशावर पांघरून घालण्यासाठी? कधी कधी तुम्ही असे काही अनाकलनीय वागता की...

गांधी : म्हणजे मी काहीही न करता गप्प बसायला हवं होत?

विदूषक : अल्पसंख्याकाच्या प्रश्नावर ब्रिटीश सरकारनं निर्णय घ्यावा म्हणून दिलेल्या निवेदनावर तुम्हीसुद्धा केली होती सही.

गांधी : केली होती, मग ?

विदूषक : म्हणजे नैतिकदृष्ट्या सरकारचा निर्णय तुम्ही मान्य करायला हवा. ते सोडून तुम्ही...

गांधी : होय, पण मग माझ्या आतल्या आवाजाचं काय?

विदूषक : तुमच्या या उपोषणानं हल्लकल्लोळ माजलाय देशात.[४०]

अशाप्रकारच्या गांधी-विदूषक संवादावरून आपणाला लक्षात येते की, विदूषक कशा प्रकारचे प्रश्न विचारून गांधीना प्रश्न द्यायला भाग पाडतो. या नाटकातील संवादाने प्रश्नाची उकल होत जाते आहे. या नाटकात असे संवाद अनेक ठिकाणी आहेत. आणि या संवादामुळेच हे ऐतिहासिक विषयावरील नाटक एक प्रकारच वेगळेपण घेऊन येत.

गांधी-आंबेडकर या नाटकामध्ये धार्मिक, राजकीय, सामाजिक अशा विषयावर गांधी-आंबेडकरांमध्ये संवाद घडवून आणला आहे. त्या संवादातून इतिहासातील ते प्रसंग डोळ्यासमोर उभे राहावेत असे हे संवाद आहेत. विदूषक अधून-मधून त्यांच्या बोलण्यातील दुवा ठरतो आहे.

आंबेडकर : माझ्या पत्नीला कळलं की रायगडावर माझ्यावर हल्ला झाला तर ती भीतीनं इतकी घाबरून गेली की... तीनं कायमचं अंथरुण धरलं आणि त्या आजारातच ती गेली. या माझ्या प्रिय पत्नीसाठी तर मी हिंदूधर्म सोडताच कामा नये एकदा ती म्हणाली होती, 'पंढरपूरला जाऊ या' मी म्हटल...

विदूषक : होय. तुम्ही म्हणालात, 'जे पंढरपूर देवाच्या मूर्तीपासून दूर लोटतं त्या पंढरपूरची कथा ती काय? आपल्या उभयतांच्या पुण्याईनं, स्वार्थ त्यागानं आणि सेवेने आपण दुसरी पंढरी उभी करू.'

आंबेडकर : होय, दुसरी पंढरी, स्वत:ची हक्काची जिथं एक माणूस दुसऱ्या माणसाला म्हणणार नाही, दूर हो !

गांधी : तुमच दु:ख मी समजू शकतो डॉ. आंबेडकर.

विदूषक : तुम्ही दु:ख समजू शकता.

गांधी : दक्षिण आफ्रिकेत असतानाची गोष्ट. पहिल्या वर्गाच्या डब्यातून प्रवास करीत होतो मी. एक माणूस आला. मला जागा सोडण्यास सांगू लागला. मी जागा सोडत नाही हे पाहून त्यानं एका शिपायाला बोलावून घेतलं, माझं सामान खाली फेकलं. मला धक्के मारून बाहेर काढलं. का? तर मी भारतीय काळा, मी एवढा उच्च विद्याविभुषित बॅरिस्टर. पण ते माझी गणना कुलीमध्ये करायचे. घाव जिव्हारी बसायचा. डॉ. आंबेडकर तुमचं दु:ख मी समजू शकतो.''[४१]

अशाप्रकारच्या त्यांच्या संवादावरून गांधींना आंबेडकरांच्या दु:खाची जाणीव होते. ते आपल्या दक्षिण आफ्रिकेतील प्रसंग सांगून त्यावरून आपणाला आंबेडकरांना असणाऱ्या दु:खाची जाणीव आहे असे सांगतात.

या नाटकातील गांधी-आंबेडकरांचे संवाद हे सामाजिक, धार्मिक, राजकीय संघर्षावर आधारीत आहेत. आंबेडकरांची भूमिका विद्रोही स्वरूपाची असल्यामुळे त्याचे संवादही तसेच आहेत. गांधी-विदूषक संवाद, आंबेडकर विदूषक संवादामध्ये प्रश्न आणि उत्तरात्मक संवाद दिसून येतात. आपला समाज, आपले कुटुंब, आपला देश यांची काळजीही त्यांच्या संवादातून जाणवते.

विदूषक : पण काहीही म्हणा डॉक्टरसाहेब या महात्म्यानं तुम्हाला तरी चांगलीच टोपी लावली. एकही माणूस निवडून येऊ दिला नाही तुमचा. अस्पृश्यांच्या उद्धारासाठी आंदोलन करीत आला तुम्ही आणि यश...

आंबेडकर : यश मिळावं म्हणून आम्ही प्रचंड मेहनत केली. स्पृश्यांच्या प्रचंड मतासमोर अस्पृश्यांची टीचभर मत, काय पाड लावणार?

विदूषक : अस्पृश्यांचे प्रतिनिधी अस्पृश्यांनीच निवडून देणारं स्वतंत्र मतदारसंघाच शस्त्र तुमच्या हाती असतं तर?

आंबेडकर : पण गांधीजींनी उपोषण करुन 'पुणे करार' करण्यास मला भाग पाडलं, शिवाय आमचीच मत विभागलेली काही आमचीच मंडळी गांधीजींच्या राहुटीत गेलीत. जगताहेत दाईच्या मायेवर![४२]

अशाप्रकारच्या विदुषक आंबेडकरांच्या संवादातून आपला पराभव, आपलीच माणस आपल्याला साथ देत नाहीत म्हणून झाला व ती माणसे दुसऱ्याच्या आधारान जगतात आणि आपल्याच माणसाला पराभूत करण्यास कारणीभूत ठरतात. याबद्दल डॉ. आंबेडकरांना काळजी वाटते. स्पृश्यांच्या प्रचंड मतासमोर अस्पृश्यांची थोडी मत त्यांचा त्या ठिकाणी कसा निभाव लागणार याचीही जाणीव डॉ. आंबेडकरांना आहे. त्यात गांधीजीच्या राहुरीत आपली माणसं गेल्यामुळं आपल्याच समाजातील माणसांवर ते नाराज आहेत हे या त्यांच्या प्रसंगातील संवादावरून समजते.

कोणतेही नाटक संवादानेच घडत असते. त्यातील संवाद हे नाटकाला गतीमान करतात. त्यातील संवादामुळेच ते नाटक भारदस्त वाटते आणि त्या संवादाचा माणसाच्या मनावर परिणाम होत असतो. असेच हे नाटक आहे. यातील गांधी-आंबेडकरांच्या संवादामुळे नाटक भारदस्त वाटते आणि विदूषकाच्या संवादाने निर्माण होणारे प्रश्न विचारले जातात आणि नाटक एक वेगळेच वळण घेऊन यशस्वी होते.

## प्रेमानंद गज्वी यांच्या नाटकातील संघर्ष :

'गांधी-आंबेडकर' या नाटकामध्ये गांधीजी आणि डॉ. आंबेडकर या दोघांमध्ये वैचारिक संघर्ष आहे. हे दोन महामानव, विद्वान असे देशकार्य आणि समाजकार्य यासाठी देहभान विसरून कार्य करीत होते. पण त्या दोघांच्या विचारात आणि कार्य करण्याच्या पद्धतीत फरक आहे. त्यांना कार्य एकच करायचे आहे पण यांचे मार्ग वेगळे आहेत. अस्पृश्यासाठी त्यांच्या उद्धाराचा गांधीजी विचार करीत असताना हिंदु धर्मातील रुढी परंपरेने चालत आलेली चातुवर्ण व्यवस्था आहे तशीच ठेऊन फक्त अस्पृश्यांना सर्व सोईसुविधा मिळाव्यात आणि आजपर्यंत त्यांना जी वागणूक मिळाली तशी यापुढे मिळू नये सर्वांना समान वागणूक मिळावी असे त्यांचे मत होते. तर आंबेडकरांचे अस्पृश्यासाठी कार्य करीत असताना हिंदू धर्मातील चातुर्वर्ण व्यवस्थाच पूर्णपणे नष्ठ करून सर्वांना समान

वागणूक मिळाली पाहिजे त्याशिवाय समाज एक होणार नाही, अस्पृश्यावरील अन्याय थांबणार नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे.

गांधीजींचे हिंदू धर्मावरील असलेले प्रेम यावरून असे दिसून येते की, ते चातुर्वर्ण व्यवस्था कधी मोडायला, नष्ट करायला तयार होणार नाहीत. त्यामधील ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र, अतिशुद्र अशी जी उतरंड आहे. त्यावरती ब्राह्मण हा सर्वांना गुरू हवाच असे गांधीचे मत आहे. त्याचा सर्वनाश करून ते अब्राह्मणांना कदापी वर येऊ देणार नाहीत असे ते म्हणतात आणि गांधीजींच्या अशाच विचारामुळे डॉ. आंबेडकर व त्यांच्यात संघर्ष होतो. डॉ. आंबेडकर म्हणतात, चातुवर्ग व्यवस्था नष्ट होणार नसेल तर हिंदू धर्मात राहून अस्पृश्यांचा कधीही विकास होणार नाही.

या नाटकामध्ये आंबेडकरांची भूमिका ही संघर्षात्मक आहे. त्यांच्यावर पिढ्यान-पिढ्या जो हिंदु समाजातील उच्च समजणाऱ्या लोकांनी अन्याय, अत्याचार केला आहे. त्यांनी अस्पृश्यांना माणूस म्हणून माणसाला वागवलं नाही. जगू दिल नाही. कुत्र्या-मांजरा एवढीदेखील किंमत दिली नाही. म्हणून लहानपणापासूनच त्यांच्यावर झालेल्या अन्यायाने त्यांच्यात विद्रोह हा दिसून येतो. प्रत्येक गोष्ट मिळविण्यासाठी त्यांना संघर्ष करावा लागत आहे. काळराम मंदीर प्रवेश, महाडचा पाण्याचा सत्याग्रह, मनुस्मृती दहन कार्यक्रम, धर्मांतर, स्वतंत्र मतदार संघ, अशा सर्व प्रश्नाच्या ठिकाणी डॉ. आंबेडकरांना संघर्ष करावा लागला आहे.

गांधी आणि आंबेडकर भारत स्वातंत्र्याच्या व सामाजिक स्वातंत्र्याच्या इतिहासातील या दोन व्यक्ती आपल्या जीवनात एकमेकांचे प्रतिस्पर्धीच होते. त्यामुळे इतिहासातील कोणत्याही घटनेला धक्का न देता त्यांच्यातील संघर्ष हा या नाटकात मांडला आहे.

भारतीय स्वातंत्र्याची सारी सूत्रे गांधीच्या हाती एकवटलेली होती. ते महात्मा म्हणून मान्यता पावले होते. अशावेळी डॉ. आंबेडकरांनी गांधीजींना त्यांच्याच समोर, त्यांच्या चित्तशुद्धीबद्दल शंका घेणं त्यांच्या महात्मेपणाबद्दल बोलणं आणि तेवढ्याच त्वेषानं, 'तुमचा जन्मही झाला नव्हता तेव्हापासून मी अस्पृश्यांच्या प्रश्नाचा विचार करतो आहे.'

असं गांधीजींनी डॉ. आंबेडकरांना सुनावणं यामध्ये त्यांच्यात एक संघर्ष दिसतो. अस्पृश्यांच्या प्रश्नावर कार्य करीत असताना त्यांचा प्रतिनिधी बनण्याचा दोघांचा प्रयत्न दिसून येतो. डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्य हा एक स्वतंत्र घटक आहे. हे इंग्रज सरकारला पटवून देऊन अस्पृश्यासाठी वेगळा मतदारसंघ मंजूर करून घेतला पण त्याला विरोध दर्शविताना गांधीजींनी आमरण उपोषण सुरू केले. आणि आंबेडकरांशी त्यांच्या भेटीत जी चर्चा होते ती पुढीलप्रमाणे -

गांधी : मुळीच नाही, अस्पृश्य हे हिंदू समाजाचा अभिन्न भाग आहे. त्यामुळे राजकीय दृष्ट्या त्यांना हिंदूपासून वेगळं करता येणार नाही.

आंबेडकर : का वेगळं करता येणार नाही? हिंदू समाज म्हणजे चातुर्वर्ण ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र आणि तुमच्यामते अस्पृश्य म्हणजे पंचमवर्ण.

गांधी : अस्पृश्य हे चातुर्वर्णात येवोत वा पंचमवर्णात मी त्यांना हिंदू समाजाचा भाग मानतो. शिखाचं शिखत्व, मुसलमानाचं यवनत्व जसं चिरकालिक आहे तसं अस्पृश्य आपलं अस्पृश्यत्व चिरकालिक करणार आहेत? खानेसुमारीत अस्पृश्य म्हणून नोंदही मला मान्य नाही. कबूल की अस्पृश्य हे हिंदूपासून वेगळे आहेत हे तुम्ही पहिल्या गोलमेज परिषदेत ब्रिटीशांना पटवून दिलत. खर तर ती परिषद हिंदूस्थानची भावी राज्यघटना तयार करण्यासंबंधीची होती. पण तुम्ही अस्पृश्यांचा प्रश्न उपस्थित करून परिषदेच्या मूळ हेतूलाच हात घातलात. मी परिषदेला हजर असतो हे कदापी घडू दिल नसतं. वास्तविक तुमच्या आधीपासून मी अस्पृश्यांचा खरा प्रतिनिधी असताना आणखी एका वेगळ्या प्रतिनिधीची गरजच काय?

आंबेडकर : म्हणजे केवळ मला विरोध करण्यासाठी तुम्ही अस्पृश्यांच्या राजकीय हितावर पाणी ओतणार? अशाप्रकारे त्यांच्यातील संवादाने त्यांच्यात असणारा संघर्ष लक्षात येतो.[४३]

गांधीजींचा जीव वाचवण्यासाठी आंबेडकरांना त्यांना मिळालेला अस्पृश्यासाठी 'स्वतंत्र मतदार संघ' सोडून द्यावा लागला व पर्याय म्हणून 'पुणे करार' करावा लागला.

त्याआधारे राखीव जागा मंजूर करून घेतल्या पण आंबेडकरांना आपल्या राजकीय हक्कावर पाणी सोडावे लागले.

राजकीय डाव करून गांधीजींनी आंबेडकरांना संपवण्याचा प्रयत्न केला होता असे आंबेडकर विदुषकाला सांगतात, पण आंबेडकरांनीही गांधीजींना कोंडीत पकडण्याची संधी सोडली नाही. 'हिंदू म्हणून जन्माला आलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही.' असे आंबेडकर धर्मांतराची घोषणा करताना म्हणतात. त्यानंतर गांधी-आंबेडकरांच्या भेटीमध्ये त्यांच्यात जी चर्चा होते ती पुढीलप्रमाणे -

गांधी : धर्मांतर हा काही उपाय नव्हे खरंच.

आंबेडकर : ठीक आहे, धर्मांतर बाजूला ठेवू आणि ज्यामुळं माणसा माणसात ही दरी निर्माण झाली ते मुळच पार नष्ट करून टाकू. मला चातुवर्णाची अत्यंत घृणा आहे. चातुर्वर्णासारखी नीच व हलकट समाज व्यवस्था दुसरी सापडणार नाही. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र ही नावे अस्तित्वात आहेत. ही गोष्टच प्रत्येक हिंदूला विसरावी लागेल. 'वर्णाना ब्राह्मणों गुरु:' हे शास्त्रवचन विसराव लागेल. नव्हे, ती शास्त्रेच नष्ट करावी लागतील. आणि म्हणूनच, तुम्हाला आठवत असेल, काहीवर्षापूर्वी महाडला 'मनुस्मृती' मी जाहीरपणे जाळून टाकली.

गांधी : मी ब्राह्मणांचा सर्वनाश करून अब्राह्मणांना कदापि वर चढू देणार नाही. ब्राह्मण हा गुरू हवाच.'[४४] असे आंबेडकरांना सांगतात. अशाप्रकारचे अनेक वेळा त्यांच्यात संघर्ष झाले आहेत.

गांधी-आंबेडकर यांच्यातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय संदर्भात जो संघर्ष होता तो या नाटकातील त्यांच्या संवादावरून लक्षात येते ज्यावेळी गांधीजी आंबेडकरांना धर्मांतर करु नका म्हणतात त्यावेळी आंबेडकर म्हणतात, 'मी धर्मांतर करू नये एवढाच त्यांचा हेतू पण त्या संदर्भात प्रगती मात्र शून्य.' पण का करू नये मी धर्मांतर असे गांधींना विचारतात व लहानपणापासून आपल्यावर झालेले अन्याय सांगतात. आपणाला मिळालेली वागणूक सांगतात आणि म्हणतात.

आंबेडकर : ज्या लोकमान्य टिळकांचा राजकीय वारसा तुम्ही चालवत आहात. त्या टिळकांचा केसरीच्या मतप्रणालीनुसार के. के. सकट नावाचे मातंग गृहस्थ एक आदर्श हिंदू आहेत त्या संकटांना एक वर्षभर शंकराचार्यांच्या गादीवर बसवा. सामाजिक समता मान्य असल्यास नी ऱ्हदय पालटाचा निदर्शक म्हणून शंभर एक ब्राह्मण कुटुंबांना सकंटांचा पाया पडण्यास लावा आणि हिंदू धर्मात अस्पृश्यतेला स्थान नाही हे सिद्ध करा. मी मुळीच धर्मांतर करणार नाही. येतो मी. (डॉ. आंबेडकर जातात.)[४५]

असे मत व्यक्त करून डॉ. आंबेडकर गांधीजींना कोंडीत पकडतात. अशाप्रकारे त्यांच्यात संघर्ष हे चालू असतात. देश स्वातंत्र्य आणि सामाजिक स्वातंत्र्य मिळविताना या दोघांमध्ये अनेक संघर्ष चालू असतात. इंग्रजांबरोबर लढत असतानाच सामाजिक सुधारणेच्या चळवळीतही करीत असतात. या दोघांना एक कार्य करीत असताना, मार्ग वेगवेगळे असल्यामुळे त्यांच्यात संघर्ष निर्माण होतात.

अशाप्रकारे गांधी-आंबेडकरामध्ये जे प्रसंग आहेत त्यामध्ये त्यांच्यात संघर्ष असलेला दिसतो अशाप्रकारे हे नाटक एक वैचारिक संघर्ष असलेले नाटक आहे.

**संदर्भ सूची :**


१) प्रेमानंद गज्वी : 'गांधी-आंबेडकर' (नाटक), मॅजेस्टीक प्रकाशन, मुंबई-४, पृ. ५.

२) तत्रैव पृ. ६

३) तत्रैव पृ. ८

४) तत्रैव पृ. ९

५) तत्रैव पृ. ११

६) तत्रैव पृ. १३

७) तत्रैव पृ. १५

८) तत्रैव पृ. १६

९) तत्रैव पृ. १८

१०) तत्रैव पृ. १९

११) तत्रैव पृ. २४

१२) तत्रैव पृ. २८

१३) तत्रैव पृ. ३१-३२

१४) तत्रैव पृ. ३३-३४

१५) तत्रैव पृ. ३६

१६) तत्रैव पृ. ३७

१७) तत्रैव पृ. ३७

१८) तत्रैव पृ. ३९

१९) तत्रैव पृ. ४०

२०) तत्रैव पृ. ४५

२१) तत्रैव पृ. ५१-५२

२२) तत्रैव पृ. ५५

२३) तत्रैव पृ. ६०

२४) तत्रैव पृ. ६१

२५) तत्रैव पृ. ६३
२६) तत्रैव पृ. ६४
२७) तत्रैव पृ. ६५
२८) तत्रैव पृ. १३
२९) तत्रैव पृ. २४
३०) तत्रैव पृ. ३०
३१) तत्रैव पृ. १०
३२) तत्रैव पृ. १५-१६
३३) तत्रैव पृ. ३३-३४
३४) तत्रैव पृ. ४२
३५) तत्रैव पृ. ६२
३६) तत्रैव पृ. ८ (प्रस्तावना)
३७) तत्रैव पृ. ८
३८) तत्रैव पृ. २२
३९) तत्रैव पृ. ३६
४०) तत्रैव पृ. १२
४१) तत्रैव पृ. ३०
४२) तत्रैव पृ. ५०
४३) तत्रैव पृ. ६
४४) तत्रैव पृ. ३०
४५) तत्रैव पृ.३४